cmyk

रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळु दे...
लक्ष्मीच्या पावलांनी घर
सुख समृदीने भरू दे...!

दैनिक राज्य लोकतंत्र

लक्ष्मी पुजन निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!

www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१९० | शुक्रवार, दि.१ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# साखरेच्या विक्री किमतीसह इथेनॉलची खरेदी किंमत वाढणार

## केंद्रीय अन्न मंत्री प्रल्हाद जोशी यांचे विस्माला आश्वासन

दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारने २०१९ पासून साखरेच्या किमान विक्री किंमतीत (एमएसपी) वाढ केलेली नाही. यामुळे साखर उद्योगाचे मोठे नुकसान होत आहे. ही बाब वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने केंद्रीय अन्न मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच साखरेच्या किमान विक्री किंमतीत वाढ करण्याची मागणी केली. यावरून केंद्रीय मंत्री जोशी यांनी साखरेच्या किमान विक्री किंमतीत आणि इथेनॉलच्या खरेदी किंमतीत वाढ करू, असे आश्वासन दिले आहे.

सरकारने २०१९ च्या आध्यायदेशाप्रमाणे देशपातळीवर साखरेची



किमान विक्री किंमती ३१ रूपये प्रति किलो निश्चित केली आहे. मात्र उसाच्या एफआरपीत पाच वर्षात वाढ झाली आहे. यामुळे साखर उद्योगाला तोटा सहन करावा लागत आहे. याबाबत वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) केंद्रीय मंत्री जोशी यांची भेट घेतली होती. असोसिएशनने साखर उद्योगावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली होती. यावेळी साखर किमान विक्री किंमती आणि इथेनॉलच्या खरेदी किंमतीत वाढव करण्याची गरज असल्याचे नमुद केले होते. यावेळी वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा) चे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, कार्यकारी मंडळ सदस्य व रेणूका शुगर्सचे संचालक रवि गुप्ता, कार्यकारी संचालक अजित चौगुले व महाराष्ट्र सहकारी साखर कारखाना संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ उपस्थित होते. गेल्या पाच वर्षांत ◀◀ पान २ वर

### केंद्र सरकारच्या निर्बंधांमुळे आर्थिक फटका

दरम्यान वर्ष २०२२–२३ मध्ये राष्ट्रीय इथेनॉल पुरवठ्यामध्ये साखर उद्योगाचा वाटा ७३ टक्के आहे. पण सध्या इथेनॉल उत्पादनावर केंद्र सरकारच्या निर्बंधांमुळे या क्षेत्राला आर्थिक फटका बसला आहे. उसाच्या एफआरपीत २०२३–२४ तुलनेत २०२४–२५ हंगामात वाढ झाली आहे. गेल्या वर्षी एफआरपी ३ हजार १५० रुपये होता. तर यंदाच्या हंगामात ३ हजार ४०० रुपयांपर्यंत वाढ होऊ शकते, असा अंदाज आहे.

# वन नेशन, वन इलेक्शन, समान नागरी कायदा लवकरच-पीएम मोदी

अहमदाबाद । प्रतिनिधी

आम्ही वन नेशन, वन इलेक्शनवर काम करत आहोत. याला लवकरच मंजुरी दिली जाईल आणि ते प्रत्यक्षात आणले जाईल.



या निर्णयामुळे भारताची लोकशाही मजबूत होईल. तसेच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशाला नवी गती मिळेल. या वर्षाच्या सुरुवातीला मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला मंजुरी दिली होती आणि या वर्षाच्या अखेरीस संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रस्ताव मांडला जाईल. तसेच भारत आता समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय एकता दिवस प्रसंगी बोलताना सांगितले. ◀◀ पान २ वर

# जरांगे पाटील रविवारी करणार मोठी घोषणा !

## मुस्लीम, दलित, मराठा समीकरणावर एकमत



जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मुस्लीम धर्मगुरू, बौद्ध धर्मगुरू आणि दलित नेत्यांसोबत गुरूवारी (दि. ३१) महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मुस्लीम, दलित, मराठा समीकरणावर एकमत झाले आहे. मराठा, दलित आणि मुस्लीम एकत्र आले आहेत. एवढेच नाही तर बंजारा समाज आणि ओबीसी समाजासोबतही चर्चा करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

या बैठकीस मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते म्हणून जरांगे पाटील, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे कार्यकारणी सदस्य सज्जाद नोमानी, मौलाना जहीर अब्बास रिझवी, ऑल इंडिया शिया पर्सनल ◀◀ पान २ वर

# शरद पवारांनी बीड जिल्ह्यात जे पेरलं तेच उगवणार!

## उमेदवारीच्या आश्वासनामुळे बंडखोरी बोकाळली; बंडोबांना थंड करण्यात नाकीनऊ येणार

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर शरद पवार यांच्याविषयी सहानुभुतीची लाट राज्यात निर्माण झाली. त्यांच्या पक्षाला व उमेदवाराला मतदारांनी विजयाच्या उबरठ्यावर नेले. लोकसभेला राज्यात सर्वात जास्त यश सुध्दा पवारांच्या पक्षाला मिळाले. मात्र विधानसभेला पवारांनी भलतीच पेरणी केली असल्याने जे पेरले तेच उगवणार असल्याचे सध्या बीड जिल्ह्यातील ६



मतदार संघात चित्र आहे. पेरलेल्या


### परळीत राजेभाऊ फड निकाल फिरवणारा चेहरा

महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी संजय दौंड यांचा पाठींबा मिळवून वातावरण आपल्या बाजूने केले आहे. शरद पवारांनी शब्द दिल्याने राजेभाऊ फड हे कामाला लागले होते. ऐनवेळी राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी देऊन फड यांची नाराजी पवारांनी ओढावून घेतली. आता फड यांचे बंड पवारांसाठी डोकेदुखी ठरत असून फड हे निकाल लावणारे ठरणार असल्याची चर्चा आहे.



### आष्टीत दरेकरांची डोकेदुखी

आष्टी मतदार संघात अनेकांनी निवडणुकीची तयारी केली होती. माजी आ. साहेबराव दरेकर यांचे नाव आघाडीवर होते. मात्र त्यांना डावलण्यात आले. आता त्यांनी बंड केले असून त्यांना थंड करण्यात पवारांची डोकेदुखी होणार हे तेवढेच सत्य.



### बीडमध्ये मेटे, नवले, मस्केंमुळे डोकेदुखी वाढणार

बीड मतदार संघात जे उमेदवारीचे हक्कदार होते, त्यांनाच उमेदवारी मिळाली असली तरी ज्योतीताई मेटे, सुरेश नवले, राजेंद्र मस्के,बी. बी. जाधव यांना सुध्दा पवारांच्या उमेदवारीची अपेक्षा होती. आता यातील







बहुतांश नेत्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली असून मराठा समाजाच्या मतांमध्ये विभागणी होणार असून मेटे, मस्के, नवले यांच्यामुळे पवारांची डोकेदुखी वाढणार असल्याचे दिसते.

### आडसकरांनी चित्रच पालटले

माजलगाव मतदार संघात मोहन जगताप यांना पवारांनी उमेदवारी दिली असली तरी तत्पुर्वी रमेश आडसकर यांनी पवारांच्या पक्षात प्रवेश



करुन उमेदवारीची त्यांना अपेक्षा होती. ती भंगल्याने त्यांनी आता बंड केले असून त्यांच्या बंडाने चित्रच पालटले आहे. त्यांच्या बंडखोरीने पवारांसह जगताप, सोळंके यांची झोप उडवली आहे.

इच्छुक नेत्यांच्या बंडांना थंड करण्यात पवारांची मोठी ◀◀ पान २ वर

# डॉ.योगेश क्षीरसागर यांचा विजय कोणीच रोखू शकत नाही–बाजीराव चव्हाण

बीड । प्रतिनिधी

महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी युवासेनेची फौज उभी आहे. आपण व सर्व पदाधिकारी प्रचारामध्ये अग्रेसर राहू. सर्वांच्या साथीने बीडमध्ये महायुतीचा विजय कोणीही रोखू शकत नाही, असा विश्वास युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त केला.



बीडमध्ये युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.३०) सदिच्छा भेट दिली. यावेळी आयोजित बैठकीतून बाजीराव चव्हाण हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर, विलास मस्के, डॉ.जाधव आदींची उपस्थिती होती. आरोग्य क्षेत्रात डॉ.योगेश क्षीरसागर यांचे कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या हातून अधिकाधिक जनसेवा घडावी. आपण देखील आरोग्य क्षेत्रात काम करताना हजारो लोकांची सेवा केली. ◀◀ पान २ वर

# श्री.संताजी महाराजांच्या नावाने नवीन सभागृह बांधून देणार–धनंजय मुंडे

## शनी मंदिराच्या उर्वरित बांधकामाचेही काम मीच करणार मुंडेंचा शब्द

परळी वै । प्रतिनिधी

परळी शहरांमध्ये विविध समाजातील लोक आनंदाने व एकोप्याने राहतात. विविध, सण उत्सव महापुरुषांची जयंती पुण्यतिथी यासारखे कार्यक्रम घेण्यासाठी प्रत्येक समाजाला स्वत:चे स्वतंत्र सभागृह देण्याचा मी आजवर प्रयत्न केला आहे. तेली समाजाला सुद्धा श्री संताजी महाराजांच्या नावाने सर्व सोयी युक्त असे सभागृह बांधून देणार असल्याचा शब्द धनंजय मुंडे यांनी तेली समाजाच्या सोबत आयोजित बैठकीमध्ये दिला आहे.



परळीकरांना मागील निवडणुकीत दिलेले सर्वच्या सर्व शब्द पूर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यातून अनेक विकास कामे झाली आहेत तसेच अनेक विकास कामे प्रगतीपथावर असून काही कामांना प्रशासकीय मान्यता मिळून निधी सुद्धा ◀◀ पान २ वर

# आघाडीच्या प्रचाराचा नारळ दिवाळीनंतरच फूटणार

## राहुल गांधी,शरद पवार अन् उद्धव ठाकरे यांची उपस्थिती राहणार



मुंबई । प्रतिनिधी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी ६ नोव्हेंबरपासून महाराष्ट्रातील प्रचाराची धुरा सांभाळणार आहेत. या दिवशी ते मुंबईत महाविकास आघाडीच्या (एमव्हीए) संयुक्त रॅलीला उपस्थित राहणार आहेत. या रॅलीला राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, तिन्ही नेते कॉमन गॅरेंटीची हमीही देणार आहेत. बारामतीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ◀◀ पान २ वर

माऊली सिनेमा ग्रह केज
प्रो.प्रा.अरुण अण्णा गुंड यांच्या
तर्फे दिवाळीच्या शुभेच्छा..!
नवं नवीन मराठी व हिंदी सिनेमा पाहण्यासाठी स्मार्ट सिटी मध्ये असल्यासारखे वाटावे असे डिजिटल साउंड सिस्टीम असलेले सिनेमा ग्रह म्हणजे केज शहरात मनोरंजनाचे एक मेव ठिकाण माऊली सिनेमा ग्रह कळंब रोड केज



:::: शुभेच्छुक::::
प्रो.प्रा.अरुण अण्णा गुंड



माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!



:::: शुभेच्छुक::::
मा.मुक्तीराम आबुज
राष्ट्रीय समाज पक्ष तालुकाध्यक्ष
तथा अधिकृत उमेदवार
माजलगाव विधानसभा मतदारसंघ

cmyk

## अग्रलेख

# मांगल्याची दिवाळी !

प्रकाशाचा सण, सणांचा राजा, दीपोत्सव अशी ओळख असणाऱ्या दिवाळीच्या सणाला सोमवारपासून प्रारंभ झाला. दिवाळी हा सकारात्मकता आणि आनंद पसरविणारा सण. वसुबारस हा दिवाळीचा पहिला दिवस. या दिवशी पारंपरिक प्रथेनुसार आणि कथेनुसार गाय-वासराची पूजा केली जाते. त्यांचे पाय धुतले जातात. हळद-कुंकू लावले जाते, फुले वाहिली जातात आणि गोड नैवेद्य भरविला जातो. त्यांची यथायोग्य पूजा केली जाते. पण आता गावखेड्यातही वरचेवर पशुधन कमीच होत चालले आहे. पशुधन कमी होण्याची अनेक कारणे दिली जात आहेत. कित्येक वर्षांपासून याच पशुधनाने गावखेड्यात कुटुंबे जगवली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शेती पिकवली आणि टिकवली. आज परिस्थिती बदलत चालली आहे. कृषिप्रधान देशात शेतीचे आणि पशुधनाचे महत्त्व समजावून सांगणारा असा कोणी नेताच उरला नाही. ते फक्त राजकारण करण्यातच रमले आहेत. उद्या शेती पिकलीच नाही तर. फिर उसके बाद एक तारा बोले. शेती पिकलीच नाही तर देशात अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा होईल आणि पशुधन असेच संपत गेले तर फक्त गाय-वासरांच्या मूर्तीचीच पूजा करावी लागेल.

धनत्रयोदशीपासून दीपोत्सवाचा मुख्य काळ सुरू होतो. यंदा नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज अशी चार स्वतंत्र दिवसांची दिवाळी साजरी होत आहे. सर्वसामान्य माणूस कितीही अनंत अडचणीत असला तरी सण गोड करण्याची पूर्वापार चालत आलेली परंपरा तो पाळताना दिसतो, रिण काढून का होईना तो सण साजरा करणारच. सध्या दुथडी भरून वाहणारा बाजार हे त्याचेच प्रतीक. धनत्रयोदशी हा दिवाळी पर्वातील एक महत्त्वाचा दिवस. पौराणिक कथेनुसार या दिवशी समुद्रमंथनाच्या वेळी भगवान धन्वंतरी अमृत पात्रासह प्रगट झाले. म्हणून या दिवशी भगवान धन्वंतरी आणि देवी लक्ष्मीची पूजा करून आरोग्य, समृद्धी आणि सुख-शांतीची कामना केली जाते. धनत्रयोदशीला भांडी, सोने-चांदी आणि इतर धातू, वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. दिवाळीत कमीत कमी वायू व ध्वनिप्रदूषण होईल या बेताने फटाके फोडले जावेत. फटाक्यांच्या आतषबाजीमुळे वायू व ध्वनिप्रदूषण होते. त्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेतल्यास दिवाळीचा आनंद अधिक चांगल्या रीतीने घेता येईल. दिवे लावताना व फटाके फोडताना आपल्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, विशेषत: लहान मुलांची काळजी घ्यावी.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला आलेली दिवाळी नक्की कुणाची? गरीब सामान्यांची की असामान्य श्रीमंत राजकीय पुढाऱ्यांची असा संभ्रम पडल्यास नवल नाही. दिवसागणिक वाढणाऱ्या महागाईचा राक्षस उरावर स्वार झाला असला तरी गरिबाच्या झोपडीतही मिणमिणती पणती तेवत असते. प्रसिद्धीची एकही संधी न सोडणारे राजकीय नेते आपले छायाचित्र असलेली सुगंधी उटणे पाकिटे दीपावली सणादरम्यान घराघरांत पोहोचवत असतात. मात्र, यंदा आचारसंहिता असल्याने उटण्याचा राजकीय सुगंध हरवला आहे. तर काहींनी आधीच डाव साधल्याने नागरिकांपर्यंत त्यांना आपली दिवाळी गिफ्ट पोहोचविण्यात यश आले आहे. दुसरीकडे ऐन दिवाळीतच आचारसंहिता लागू झाल्याने दिवाळी पहाट व दीपसंध्या या कार्यक्रमांना ब्रेक लागला आहे. सर्वसामान्य माणूस महागाईने बेजार झाला आहे. ही रोजचीच रड असली तरी खर्चाची बाजू थोडी पुढे-मागे करून माणूस वेळ मारून नेतो आणि दिवाळीसारखा मोठा सण शक्य तितक्या आनंदी वातावरणात जावा यासाठी प्रयत्नशील असतो. दिवाळी गरिबाला वर्षभराची ऊर्जा देणारी असते. गावाकडे गायीची बछड्यासह पूजा करणारी वसुबारस, शेतीतील पीक अल्प का असेना, धनधान्याची पूजा करणारी धनत्रयोदशी आणि बहिणीवरील मायेपोटी दूरवरून धावपळ करीत येणाऱ्या भावाची भाऊबीज म्हणजे या गरिबांसाठी असलेला सेफ्टी व्हॉल्व्हच. खिशात पैसे खुळखुळत नसले तरी असलेल्या दीड दमडीत स्वत:साठी नाही पण बायको-मुलांसाठी कपडे घेणारा कष्टकरी या चार दिवसांत गरिबीला विसरून जातो. झोपी गेलेल्या मुलाच्या हातातील अर्धवट खाल्लेला लाडू पाहून त्याला कौटुंबिक सुखाचे समाधान मिळते. श्रीमंतासारखी फटाक्यांची आतषबाजी करता आली नाही तरी न वाजलेले फटाके गोळा करून ते वाजवताना मुलांच्या चेहऱ्यावरील हसू हीच त्याच्यासाठीची खरी दिवाळी. दिवाळी संपते, पणती विझते पण झोपी गेलेल्या मुलांचे आनंदी चेहरे पाहून तो ताजातवाना होतो व पुन्हा कामाला लागतो. सण गोड करण्याची आपली परंपरा इमानेइतबारे जपणाऱ्या सर्वसामान्याच्या आयुष्यात भविष्यात खऱ्या अर्थाने गोडवा निर्माण होईल अशी आशा-अपेक्षा मनी बाळगत हा मांगल्याचा सण उत्साहाने साजरा करू या.

## प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी ६ तारखेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा

# मी आता आखाड्यात उतरलोय आता माघार नाही-माजी आ.भीमराव धोंडे

**आष्टी । पतिनिधी**

**गेल्या अनेक वर्षापासून मतदार संघातील गोरगरिबांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे तरी वाढत चाललेली दहशत संपवण्यासाठी यावेळी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे मला सहकार्य करा असे आवाहन माजी आ. भीमराव धोंडे यांनी धानोरा येथे केले. पिंपळा, दौलावडगाव गट आणि धानोरा पं. स. गणातील बुथ प्रमुख आणि कार्यकर्ते बैठकीत धानोरा येथे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती कुमार बांदल होते.**



यावेळी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे, माजी सभापती साहेबराव म्हस्के, मुकादम मुरलीधर लगड, अभयराजे धोंडे, राजाराम ननावरे, पांडुरंग गावडे, नरहरी तागड, बाबासाहेब जाधव, रंगनाथ बोडखे, माजी सरपंच संजय कवडे, संजय धायगुडे, झुंबर चव्हाण, फारुकभाई, तुकाराम चव्हाण, बाळासाहेब शेकडे, बबन ननावरे, धुळाजी लकडे व इतर उपस्थित होते. पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, लोकांच्या आग्रहास्तव विधानसभा निवडणुकीत अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे . पहिल्या टप्प्यात मी आमदार असताना मतदारसंघात एक हजार पाझर तलाव केले. रस्ते करुन ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू केले. संस्थेत सर्व जाती धर्माचे लोक नोकरीला आहेत. मतदारसंघातील दहशत संपवण्यासाठी आपल्याला निवडणुक जिंकायचीच आहे. त्याकरीता सर्वांनी माझ्यापाठीमागे उभे रहा. लोकशाही मार्गाने दहशत संपत असते. मागच्या निवडणुकीत मला फसविले गेले. मतदारसंघातील अनेक गावांत जल जिवन योजनेचे काम बोगस झाले आहेत. शासनाच्या पैशाचा मोठ्या अपव्यय झाला आहे. आष्टी येथे ६ तारखेला प्रचाराचा नारळ फोडण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मतदारसंघातील पुरुष व महिलांनी प्रचंड संख्येने उपस्थित रहावे ऐतिहासिक अशी सभा होणार आहे. माजी सभापती साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की, या भागाला कुकडीचे पाणी मिळावे यासाठी माजी आ.भीमराव धोंडे हे मुंबईला पायी गेले. लोणी गटात २०१४ पुर्वी रस्ते अत्यंत खराब होते. भीमराव धोंडे आमदार झाल्यानंतर सर्वच रस्ते चांगल्या दर्जाचे केले. त्या पाच वर्षांत मतदारसंघात रस्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. धानोरा गावांतून खऱ्या अर्थाने मा. आ.भीमराव धोंडे यांच्या राजकारणाची सुरुवात झाली. ही निवडणूक कार्यकर्त्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे. मला जि.प. निवडणुकीत फसविले, साहेबांना गेल्या निवडणुकीत फसविले होते. या निवडणुकीत बुथ प्रमुख व कार्यकर्त्यांनी जागरूक राहून काम करावे. धुळाजी लकडे यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे हे आमदार झाल्यानंतर मतदार संघाला शांतता मिळणार आहे. उपसरपंच चांगदेव एकशिंगे यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे हे शांत, संयमी नेते आहेत. ते अपक्ष उमेदवार आहेत हे चांगले झाले. फळांची अपेक्षा न करता काम करीत राहिल्यास लाभ आपोआप मिळतो. मी गेल्या १४ महिन्यापासून मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सोबत काम करीत आहे. त्या कामाचा गावांसाठी चांगला फायदा झाला. कोणाचाही दबाव आला तरी आपण उमेदवारी मागे घ्यायची नाही अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, मतदारसंघाला विकासासाठी माजी आ. भीमराव धोंडे साहेबांची गरज आहे. साहेब सर्वांसाठी काम करतात. मतदारसंघातील गोरगरिबांच्या मुलामुलींना शिक्षण मिळावे यासाठी शाळा महाविद्यालये सुरू केले. विधानसभा सदस्य असताना पाझर तलाव व रस्ते करुन विकास केला. बुथ प्रमुखांनी आपापल्या गावात प्रचाराचे व मतदान करुन घेण्याचे व्यवस्थीत नियोजन करावे. याप्रसंगी पांडुरंग गावडे , युवराज खटके, सरपंच संजय विधाते, माजी उपसरपंच भगवान काळे, अरुण क्षेत्रे, योगेश विधाते, माजी पं. स. सदस्य संजय धायगुडे, सरपंच भरत जाधव, भरत काळे, कुमार तागड, राधाकीसन सिरसाट, अमोल खटके, माजी सरपंच संजय नालकोल, महादेव पांढरे, कैलास वायभासे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमास सरपंच तात्यासाहेब नालकोल, सरपंच सावता ससाणे, जि. प. सदस्य सुरेश माळी, उपसभापती नामदेव धोंडे, नानाभाऊ वाडेकर, दत्तोबा शेळके , महेंद्र फुलमाळी, अनिल गायकवाड, सरपंच सोमीनाध गायकवाड, सौरभ दिघे, आवेज सय्यद, दिगंबर मेहेत्रे, म्हातारदेव शेकडे, चेअरमन पांडुरंग धोंडे, माजी सरपंच संजय नालकोल, भाऊसाहेब देसाई, बाबुराव कदम, बाबासाहेब एकशिंगे, भिकाजी दातीर, अशोक अडागळे, सरपंच संजय विधाते, देविदास परकाळे, लक्ष्मण झगडे, अशोक गवळी, नवनाथ शेळके, सावन तागड, सरपंच ठोंबरे, संतोष देशमुख, उपसरपंच माणिक मराठे, बापु पठारे, सागर तळपे, अनिस सय्यद, बाबासाहेब तागड, ग्रा.पं. सदस्य औटे जे.बी., आशोक माळी ,रामदास औटे, मुकुंद घाटविसावे ,आरुण क्षेत्रे, विलास घाटविसावे ,रावसाहेब मेहेत्रे ,तुकाराम औटे, राधाकिसन शिरसाट, महेश शेळके, नईम शेख, ज्ञानेश्वर मगर, हरिभाऊ जंजिरे, अशोक काळे, काकासाहेब झांजे, नंदकुमार फसले, सरपंच भरत जाधव, परमेश्वर कर्डीले, गणेश पवार, दादासाहेब इथापे, बाबासाहेब एकशिंगे, लक्ष्मण शेळके, माजी सरपंच चंद्रशेखर साके, मच्छिंद्र शेळके, पांडुरंग सायंबर, कृष्णा सायंबर, याकुब शेख, सुभाष काळे, सरपंच ज्ञानेश्वर वाघ, सुरेश शेकडे, नवनाथ राठोड, रामकिशन ठोंबरे, अमोल खटके, मुकेश घाटविसावे, संतोष शेळके, संभाजी पांडूळे, सचिन सुंबे, दादा ठोंबरे, भरत चव्हाण, नवनाथ शेळके व इतरांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन दादासाहेब विधाते व कैलास वायभासे यांनी केले.

# ऊसतोड मजुरांच्या मतदानाबाबत याचिका

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**ऊसतोड मजुरांच्या मतदानावरून मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. ही याचिका महाराष्ट्र श्रमिक ऊस तोडणी व वाहतूक कामगार संघटनेतर्फे राज्य अध्यक्ष जीवन हरिभाऊ राठोड यांनी दाखल केली आहे. यावर आता ११ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. या याचिकेतून, राज्यात विधानसभा निवडणूका जाहीर झाल्या असून २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.**

मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश येथील सुमारे १२ ते १५ लाख ऊसतोड कामगार स्थलांतरित होतात. ते महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र, तेलंगणा व तामिळनाडू राज्यांमध्ये जातात. मजूर स्थालांतरीत झाल्यास ते मतदानापासून वंचित राहतील. यासाठी केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोगाने उपाययोजना कराव्या, असे याचिकेतून म्हटले आहे. या याचिकेत राज्याचे मुख्य सचिव, केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य साखर संघ, साखर आयुक्त व गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांना या प्रतिवादी करण्यात आले आहे.



# उद्या ह.भ.प इंदुरीकर महाराज यांचे आशीर्वाद मंगल कार्यालयात कीर्तन

**बीड प्रतिनिधी**

दीपावली पाडव्यानिमित्त दि.२ नोव्हेंबर शनिवार रोजी तरुणांना समाज प्रबोधन पर मार्गदर्शन करण्यासाठी खास निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम ठेवलेला आहे तरी बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला व विशेष करून तरुणांना आवाहन करण्यात येत आहे की आपण या कीर्तन सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन वारकरी संप्रदायाचे बीड जिल्हा अध्यक्ष ह भ प हरिदास भाऊ जोगदंड यांनी केले आहे . तरी सर्वांनी कीर्तन सेवेचा लाभ घ्यावा अशी सर्वांना विनंती करण्यात आली आहे.

# जालना पाच विधानसभा मतदारसंघात १६ लाख ५२ हजार मतदार-जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी**

**भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. या पार्श्वभूमिवर दि.१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम यादीनुसार जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात पुरुष ८ लाख ६० हजार, स्त्री ७ लाख ९२ हजार आणि तृतीयपंथी ४२ मतदार अशी जिल्ह्यात अंतिम एकुण १६ लाख ५२ हजार ५११ मतदारांची संख्या आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.**



दि.१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा द्वितीय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात सैन्य दलातील पुरुष १ हजार ५३१ तर स्त्री ३१ असे एकुण १ हजार ५६२ मतदार आहेत. जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात १८ ते १९ वयोगटातील पुरुष २५ हजार ४८९ तर स्त्री १५ हजार ५६५ आणि तृतीयपंथी २ असे एकुण ४१ हजार ५६ उमेदवार आहेत. जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात पुरुष ८ हजार १८७ व स्त्री ५ हजार ४६५ असे एकुण १३ हजार ६५२ दिव्यांग मतदार आहेत. तर वय वर्षे ८५ पेक्षा अधिक असलेले एकुण २७ हजार २८७ मतदार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील मतदार संघातील मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे तसेच ज्या ठिकाणी १५०० पेक्षा जास्त मतदार संख्या असलेल्या मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात येवून नवीन मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत. यानुसार जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात एकुण १७५५ मतदान केंद्र आहेत.

## पान १ वरून...

### वन नेशन, वन इलेक्शन, समान

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी गुरुवारी (दि.३१) केवडिया येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४९ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जातो. त्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावेळी बोलताना पीएम मोदी यांनी सर्व देशवासियांना राष्ट्रीय एकता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रीय एकता दिवस एक अद्भुत योगायोग घेऊन आला आहे. आज एकीकडे आपण एकात्मतेचा उत्सव साजरा करत आहोत, तर दुसरीकडे दिवाळीचा सण आहे, असे पीएम मोदी यावेळी बोलताना म्हणाले.

-------------

### साखरेच्या विक्री किमतीसह इथेनॉलची

उसाच्या एफआरपीत वाढ झाली आहे. उसाची एफआरपी २ हजार ७५० रूपयांवरून ३ हजार ४०० रुपये प्रति टनापर्यंत वाढली. पण साखरेच्या किमान विक्री मूल्यात वाढ झालेली नाही. राष्ट्रीय स्तरावर साखरेचा उत्पादन खर्च ४१.६६ रुपये प्रति किलो आहे. यामुळे साखर उद्योगाचा खर्च वाढत असून तोटा सहन करावा लागत असल्याचेही विस्माने म्हटले आहे. विस्माने साखर कारखान्यांसमोरील आव्हानांवरून साखरेच्या किमान विक्री मूल्यात ७ रूपये आणि तेल विपणन कंपन्यांकडून इथेनॉल खरेदी किंमतीत ५ रुपये प्रति लिटरने वाढ करावी, अशी विनंती केली होती. शिवाय विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी दरवाढीशिवाय साखर कारखानदार गळीत हंगाम वेळेवर सुरू करणार नाहीत, असा इशारा दिला होता. यानंतर केंद्रीय मंत्री जोशी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळ समितीकडे असोसिएशनची मागणी पाठवली जाईल. असोसिएशनच्या मागण्यांबाबत शिफारस करू, असे आश्वासन दिले आहे. याआधी देखील २८ ऑक्टोबर रोजी विस्माचे अध्यक्ष ठोंबरे यांनी शिष्टमंडळासह नवी दिल्लीत अन्नमंत्र्यांची भेट घेतली होती. त्यावेळी १५ नोव्हेंबर पासून गळीत हंगाम सुरू करणे कठीण झाले असून साखर कारखान्यांना गंभीर आर्थिक फटका बसल्याचे सांगितले होते.

---------

### शरद पवारांनी बीड जिल्ह्यात

ताकद खर्ची होणार असल्याचे दिसून येत आहे. बीड जिल्हा हा स्व. गोपीनाथ मुंडे आणि शरद पवार यांना मानणारा असून आतापर्यंत कधी मुंडेंचे तर कधी पवारांचे जिल्ह्यावर वर्चस्व राहिले आहे. त्यातल्या त्यात मुंडे साहेबांवर या जिल्ह्याने जास्त प्रेम केले आहे. वर्चस्वाच्या या लढाईत पवारांनी मुंडेंचे पुतणे धनंजय मुंडे यांना सोबत घेत मुंडेंना शह देण्याचा डाव टाकला पण मुंडे पवारांना पुरुन उरले असल्याचे संपुर्ण जिल्ह्याने पाहिले आहे. मात्र मुंडे साहेबांनंतर २०१४ सालीच्या विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ६ पैकी ४ जागांवर पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने यश मिळवले होते. गेल्या अडीच वर्षापासून मुंडे बहिण -भाऊ एकत्र येऊन आणि पवारांच्या पक्षात उभी फुट पडून सुध्दा पवारांच्या पक्षाच्या उमेदवारांने लोकसभेला पंकजा मुंडे यांचा पराभव करीत बजरंग सोनवणे हे बीडचे खासदार झाले. पवारांच्या पक्षासोबत नेत्यांपेक्षा जनता असल्याचे सिध्द झाले. पुढे विधानसभेला मात्र पवारांना उमेदवारीसाठी बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघात नेत्यांची गरज होती. त्यानुसार योग्य उमेदवार शोधण्याच्या नादात शरद पवारांनी सर्वच मतदार संघात अनेकांना उमेदवारीच्या नादी लावले. त्यामुळे बीडमध्ये राजेंद्र मस्के, ज्योतीताई मेटे, कुंडलिक खांडे, बी. बी. जाधव, गेवराईत आ. लक्ष्मण पवार, पुजा मोरे यांची नावे चर्चेत होती. आ. पवारांनी मात्र पवारांच्या पक्षात प्रवेश केला नाही. माजलगावात मोहन जगताप, रमेश आडसकर, अशोक डक, नारायण डक, राधाकृष्ण होके पाटील, परळीत राजेभाऊ फड, संजय दौंड, बबन गिते, आष्टीत भीमराव धोंडे, साहेबराव दरेकर, नरसिंग जाधव, सुशिलाताई मोराळे, राम खाडे, केजमध्ये पृथ्वीराज साठे, संगिता ठोंबरे, अंजली घाडगे यांचा समावेश आहे. उमेदवारी मात्र पवारांनी ज्यांना द्यायची त्यांना दिली. तर काही मतदार संघात ज्यांचे नाव चर्चेत नव्हते त्यांना सुध्दा उमेदवारी दिली गेल्याने आता प्रत्येक मतदार संघात बंडोबांची संख्या मोठी असून याच बंडोबांना थंड करण्यात आता पवारांच्या नाकीनऊ येणार असल्याचे चित्र आहे.

-------

### जरांगे पाटील रविवारी

लॉ बोर्ड चे वरिष्ठ उपाध्यक्ष, रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, राजरत्न आंबेडकर, डॉ. अझीमुद्दीन सय्यद, अंजार अन्वर खान, राष्ट्रीय सरचिटणीस ऑल इंडिया उलामा बोर्डाचे मौलाना निजामुद्दीन फखरुद्दीन, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे सदस्य मौलाना अब्दुल मजीद शेख, मुफ्ती नईम, मोहसीन शेख, मुजतबा फारूक, खा. चंद्रशेखर आझाद यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जरांगे पुढे म्हणाले की, परिवर्तनासाठी दलित- मुस्लिम - मराठा एकत्र आले आहेत. आम्ही आता सगळ्या प्रश्नांवर एकत्र आलो आहोत. कोणते मतदार संघ आणि उमेदवार कोण याची घोषणा ३ नोव्हेंबरला करणार आहे. आम्ही लोकशाही मार्गाने उभे राहतोय, आमच्यावर कुणीही ददागिरी करू नये. आमच्यावर गुंडगिरीचे प्रयोग करायचे नाहीत, आमचे काम ४ तारखेपासून सुरू होणार आहे. आरक्षणाला आम्ही सरकारला लागत नाही, आम्ही धर्म परिवर्तन नाही, तर सत्ता परिवर्तन करण्यासाठी एकत्र आलो आहोत. लिंगायत, बंजारा, धनगर, महानुभाव पंथाच्या बांधवांनीही आमच्याकडे यावे, असे आवाहन पाटलांनी यावेळी केले.

----------

### श्री.संताजी महाराजांच्या

प्राप्त झालेला आहे. त्यामुळे कुणी कितीही आरोप करून मला एकटे पाडण्याचा किंवा घेरण्याचा प्रयत्न केला तरी मी परळीची निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढत आहे, शनी मंदिराचे उर्वरित बांधकाम देखील मीच पूर्ण करणार आहे असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. परळी शहरात तेली समाजाच्या प्रतिनिधी व नागरिकांच्या समवेत धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र बैठकीद्वारे हा संवाद साधला. यावेळी दांडिया महोत्सव व इतर सामाजिक उपक्रम आयोजित करणाऱ्या तेली समाजातील तरुणांचे धनंजय मुंडे यांनी कौतुक केले. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, संगमेश्वर फुटके, चंद्रकांत उदगीरकर, आयुब खान पठाण, सुरेश आण्णा टाक, चेतन सौंदळे, अॅड मंजीत सुगरे, कुमार व्यवहारे, दत्ताभाऊ सावंत, के डी उपाडे, प्रा. विनोद जगतकर, सूर्यकांत व्यवहारे, गुरुलिंग आप्पा पिंपळे, पांडुरंग अप्पा कोल्हे, शिवशंकर व्यवहारे, रामकीशन साखरे, तुळशीदास सालमोटे, डॉ.बावरे साहेब, पवन फुटके, प्रा.मधुकर शिंदे, अशोक बेंडे, छगन क्षीरसागर, मारुती अन्नपूर्णे, शंकर साखरे, राजाभाऊ शिंदे यांसह आदी उपस्थित होते.

-----------

### डॉ.योगेश क्षीरसागर यांचा विजय कोणी

तरुणांचे संघटन उभारले आहे. ही सर्व ताकद बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुतीच्या सर्व नेत्यांनी त्यांना उमेदवारी दिली. आता महायुती धर्म पाळून डॉ.योगेश क्षीरसागर यांना आमदार करण्यासाठी युवासेनेची फौज जिवाचे रान करेल, असा शब्द बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी यथोचित सत्कार करून निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेससह शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### आघाडीच्या प्रचाराचा

शरद पवार म्हणाले की, निवडणूक प्रचाराला ६ नोव्हेंबरपासून मुंबईतून सुरुवात होणार आहे. लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी एक समान किमान कार्यक्रम देखील जारी करेल. विरोधी पक्षनेत्यांच्या मैत्रीपूर्ण लढतीबाबत पवार म्हणाले की, फक्त १०-१२ जागांवर दोन उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. येत्या काही दिवसांत आपण यावर तोडगा काढू आणि या समस्येवर तोडगा काढू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, संजय राऊत यांनी सांगितले की, राज ठाकरे आपल्या मुलाच्या भविष्यासाठी पंतप्रधानांचे कौतुक करत आहेत. राऊत म्हणाले की, राज ठाकरे त्यांचा मुलगा अमित ठाकरे यांच्या राजकीय कारकिर्दीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे कौतुक करत आहेत. राऊत म्हणाले की, ठाकरे कधी-कधी पंतप्रधान मोदी आणि शहा यांना महाराष्ट्रात येण्यापासून रोखण्याचे बोलले. आज अचानक असे काय झाले की ते त्याचे गुणगान करत आहेत. त्यांचा मुलगा माहीममधून निवडणूक लढवत असल्याचे आपण समजू शकतो. त्याला स्वतःच्या मुलाच्या भविष्याची चिंता आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.०१ नोव्हेंबर २०२४


## उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी स्वत: अर्ज सादर करा -निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले



माजलगाव : माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३१ ऑक्टोबर गुरुवार रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय,तहसील कार्यालय, माजलगाव येथे सकाळी ९.४५ ते ५.४५ वाजता व दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत स्वत: हजर होऊन अर्ज सादर करावेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ ते ०३ नोव्हेंबर २०२४ या तिन्ही दिवशी शासकीय सुटी असल्याने कार्यालयास उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करता येणार नाही.तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेनंतर चिन्ह वाटप करण्याची सुरूवात होईल, चिन्ह वाटपाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच चिन्ह वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळवले आहे.

# रेशनकार्डच्या केवायसीला वृद्ध व बालकांचे थम्ब होईनात

## प्रशासनाने लाभार्थी वंचित राहणार नाहीत यावर तोडगा काढावा

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

शिधापत्रिकेत नावे समाविष्ट असलेल्या कुटुंबीयांनी ३१ ऑक्टोबर पर्यंत आपली ई-केवायसी करून घ्यावयाची मुदत दिली होती.तसेच शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी ई-पॉस डिजिटल यंत्रणेमध्ये आपला आधार क्रमांक सीडिंग करून घ्यायचा असे बंधनकारक अन्न व सार्वजनिक मंत्रालयाने निर्देश दिले होते.जे शिधापत्रिकेतील पात्रधारक ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करणार



नाहीत त्यांचे विनामूल्य मिळणारे स्वस्त धान्य १ नोव्हेंबर पासून बंद होणार व त्यांची नावे ही कमी होतील. असे प्रशासनाने सुचित केले होते.संबंधीत स्वस्त धान्य दुकानात शिधापत्रिकाधारक पात्र लाभार्थींनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता उपस्थित राहून ई-केवायसी करून घेतली.शासनाने ई-केवायसी म्हणजे थम्ब व्हेरिफिकेशन करण्याची अट घातली आहे.त्यामुळे या योजनेतील बनावट लाभार्थींचा शोध ई-केवायसीतून घेतला जाईल.तसेच बोगस लाभार्थींना चपराक बसेल.परंतु,पात्र लहान मुलांच्या केवायसी थम्ब बसत नाहीत.कारण आधार कार्ड अपडेट आल्याने अनेक लहान मुलांचे केवायसी व वृद्धांची केवायसी थांबली आहे.त्यामुळे या योजनेत पात्र असलेले लहान मुले व वृद्ध मंडळी वंचित राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.संबंधित प्रशासन व विभागाने सर्वसामान्यांची अडचण लक्षात घेऊन यावर काहीतरी उपाययोजना करून पात्र असूनही अपात्र होणार नाहीत अशी सर्वसामान्य नागरिकांकडून मागणी होत आहे.



बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी राहुल भैया सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करताना तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, उपाध्यक्ष शेख कादर बादशहा, सचिव शेख अर्शद, युवक काँग्रेसचे युवा नेते उमेश डमरे, विधानसभा अध्यक्ष हनुमान घोडके, इंटकचे सखाराम बेगडे आदी पदाधिकारी दिसत आहेत.

## अंमळनेर येथे लोकमान्य नागरी पतसंस्थेच्या वतीने गुणवंताच्या सत्काराचे आयोजन

...प्रतिनिधी

अंमळनेर आणि अंमळनेर परिसरातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये दैदीप्यमान यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गुणवंतांचा सोहळा अंमळनेर येथील लोकमान्य नागरी पतसंस्था मर्यादित अंमळनेर च्या वतीने करण्यात येणार आहे.

दि.३/११/२०२४ रविवार रोजी गुणगौरव गुणवंतांचा सत्कार समारंभचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अश्वत्थलिंग संस्थांनचे महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज व मार्गदर्शक अॅड.एन.एन.साबळे (सरकारी वकील,बीड) तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय शिंदे (दुय्यम निबंधक,दापोली),भार्गव सपकाळ (स.पो.नि.पोलिस स्टेशन,अंमळनेर), आर.एल.उंडे सर (सेवानिवृत्त मुख्याध्यापक) उपस्थित राहणार आहेत.

गौरव गुणवंतांचा हा कार्यक्रम गेल्या ४ वर्षापासून राबविण्यात येत आहे. अंमळनेर आणि परिसरातील सर्व विद्यार्थी,पालक यांना या कार्यक्रमामधून प्रेरणा मिळत आहे. दि.३/११/२०२४ रोजी होणाऱ्या या गौरव गुणवंतांच्या सोहळ्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थी तसेच त्यांचा कुटुंबीयासहित सत्कार करण्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमामध्ये उपस्थित सर्व मार्गदर्शक आणि प्रमुख पाहुण्यांचे विविध विषयावर उपस्थितांना मार्गदर्शनपर संबोधन केले जाईल. अंमळनेर आणि परिसरातील सर्व विद्यार्थी,पालक तसेच सर्व शिक्षणप्रेमींनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन लोकमान्य नागरी पतसंस्था मर्यादित अंमळनेरचे चेअरमन प्रा.मनोहर अंकुश पवार यांच्यासह सर्व संचालक मंडळ यांनी केले आहे.

# रोटरीने केली उपेक्षितांची दिवाळी गोड

## निराधार,दिव्यांग व भक्तीप्रेम आश्रमात फराळाचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहर व परिसरातील निराधार,दिव्यांग,मनोरुग्ण व भक्तीप्रेम आश्रमात दिवाळीच्या फराळाचे वाटप करून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ने उपेक्षितांची दिवाळी गोड केली. गुरुवारी सकाळी मानवलोक जनसहयोग कार्यालय येथे दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या कल्पना लोहिया होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध व्यापारी जुगलकिशोर सारडा,प्रसिद्ध हृद्यरोग तज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, रोटरीचे प्रांत संचालक प्रवीण चोकडा, प्रा. संतोष मोहिते,प्रा. रोहिणी पाठक, आनंद कर्णावट,डॉ.निशिकांत पाचेगावकर,मोईन शेख,जगदीश जाजू




,रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, प्रोजेक्ट डायरेक्टर अविनाश मुडेगावकर,को.प्रोजेक्ट डायरेक्टर राम सारडा,मानवलोक जनसहयोग चे शाम सरवदे,संजना आपेट,दिलीप मारवाळ, सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना कल्पना लोहिया म्हणाल्या की रोटरी क्लब गेल्या ११ वर्षा पासून सातत्याने हा उपक्रम राबवून उपेक्षितांच्या जीवनात गोडवा निर्माण करत आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय देता आला पाहिजे.असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.नवनाथ घुगे, प्रवीण चोकडा, प्रा. रोहिणी पाठक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनराज सोळंकी यांनी केले.संचलन भीमाशंकर शिंदे यांनी तर उपस्थितांचे आभार राम सारडा यांनी मानले. यावेळी प्रवीण मार्कंडेय, भागवत कांबळे, विश्वनाथ लहाने,डॉ.अनिल केंद्रे,अजित देशमुख, प्रा.रमेश सोनवळकर,शिवकुमार निर्मळे, सचिन बेंबडे, प्रा.अजय पाठक,राधेश्याम लोहिया,डॉ,सुरेश अरसुडे, पुरुषोत्तम रांदड,गणेश घाडगे, प्रदीप झरकर यांच्यासह रोटरी क्लब चे सदस्य उपस्थित होते.

## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयास नॅक चा बी दर्जा प्राप्त

परळी । प्रतिनिधी)

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयास नॅक चा बी दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाने नॅकच्या मूल्यमापनात तिसऱ्यांदा हे घवघवीत यश प्राप्त केले आहे. तृतीय मूल्यमापनासाठी नॅक च्या त्रिसदस्यीय समितीच्या तज्ज्ञांनी दि २२ व २३ऑक्टोबर रोजी महाविद्यालयास भेट दिली होती.

या समितीत डॉ जितेनकुमार सोनी ( माजी कुलगुरु सौराष्ट्र विद्यापीठ , गुजरात) हे समितीच्या अध्यक्षस्थानी होते तर डॉ.वासंती ताटिमाकुला (योगी वेन्नम्मा विद्यापीठ कडापा,आंध्रप्रदेश) व डॉ . पार्वती रुद्रप्पा(व्ही इ टी फर्स्ट ग्रेड कॉलेज,बेंगलोर - कर्नाटक ) यांनी सदस्या म्हणून काम पाहिले.त्यांच्या या दोन दिवसीय भेटीत त्यांच्याद्वारा महाविद्यालयातील विविध विभागांची तपासणी केली गेली.त्यात महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम , समाजोपयोगी घेतलेली भूमिका ,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य,कार्यालयीन कामकाज,ग्रंथालय,प्रयोगशाळा अशा विविध विभाग कार्याचे मूल्यमापन केले .

महाविद्यालयातील विविध विभाग ,विविध मंडळे - भाषावाङ्मय मंडळ , विज्ञान मंडळ , सामाजिकशास्त्रे मंडळ , राष्ट्रीय सेवा योजना विभाग , क्रीडा विभाग , परीक्षा विभाग, विद्यार्थिनी कल्याण विभाग,य.च.म.मु.विद्यापीठाचे अभ्यासकेंद्रासह महाविद्यालयात कार्यरत असलेल्या विविध क्लब कार्यांचीही त्यांनी भेट देऊन माहिती घेतली होती. याबरोबरच महाविद्यालयांमध्ये माजी विद्यार्थिनी मेळावा , पालक मेळावा घेऊन यांत पालक व माजी विद्यार्थिनींशीही या कमिटीने संवाद साधला होता. शिवाय सध्या महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थिनींसोबत त्यांनी विविध प्रश्नांच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे मनोगत ऐकून घेतले होते. सांस्कृतिक कार्यक्रम , संशोधनपर कार्य या सर्वांची योग्य ती दखल घेऊन नॅक मूल्यमापन समितीने महाविद्यालयास नॅकचा बी दर्जा प्रदान केला आहे.ही महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी आनंदाची बातमी आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. श्यामरावजी देशमुख यांच्या स्वप्नाला मूर्त रूप देण्यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक कामगिरी करत महाविद्यालयाने नॅक चा बी दर्जा प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक मा.अनिलरावजी देशमुख,संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा.संजयजी देशमुख , मा.सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष मा.प्रा. प्रसाद देशमुख,संचालिका मा.विद्याताई अनिलराव देशमुख मा.छायाताई देशमुख व इतर संचालक मंडळाने व महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या संचालिका डॉ.विद्याताई देशपांडे तसेच महाविद्यालयीन अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक,डॉ.शिवनारायण वाघमारे यांच्याबरोबरच सर्व वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.यावेळी बोलताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विद्याताई देशपांडे यांनी या पुढेही सामाजिक कार्याबरोबरच शैक्षणिक दृष्टीने उच्चतम भूमिका पार पाडण्याचा मनोदय व्यक्त केला.

## माजलगावमध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ फराळाचे वाटप

माजलगाव (प्रतिनिधी) शहरात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी काही निवडक अंध अपंग निराधार व्यक्तिंना लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ दि ३१ ऑक्टोबर गुरुवार रोजी फराळाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ काही निवडक अंध अपंगांना दिवाळी निमित्त फराळाचे खरात आडगावचे सरपंच दत्ता आढाव,युवा नेते गजानन वारे



यांच्या हस्ते दि ३१ ऑक्टोबर गुरुवार रोजी वाटप करण्यात आले.या कार्यक्रमांचे आयोजन लोकनेते गोपीनाथ मुंडे अखंड पाणपोईचे अध्यक्ष तात्या पांचाळ यांनी केले होते.

## ऐन दिवाळीत प्रकाश सोळंकेच्या गडाला मोहनराव जगतापांनी लावला सुरुंग

माजलगाव । प्रतिनिधी

ऐन दिवाळी सणात माजलगाव विधानसभेचे वातावरण चांगलेच तापले आहे.उमेदवारीवरून सुरु झालेल्या काका पुतण्यातील वादातुन कसेबसे आ.प्रकाश सोळंके सावरत असतानाच त्यांचे मुख्य विरोधक तुतारी चे उमेदवार मोहनराव जगताप यांनी त्यांच्या एका एका गडास सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे.आज बोरगाव कोथरूळ येथील सोसायटी चेअरमन सह ग्रामपंचायत सदस्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी शरद पवार या पक्षात प्रवेश केला.

छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा जाहीर प्रवेश गणेश



### छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन,माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा गणेश रांजवण यांच्या पुढाकाराने जाहीर प्रवेश

रांजवण यांच्या पुढाकाराने आज मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्ष प्रवेश केला.

छत्र बोरगाव सेवा सह. सोसायटी चेअरमन अरुणराव जाधव,मा. उपसरपंच परमेश्वर जाधव,भागवतराव जाधव,माजी सरपंच सुदामराव कदम,लक्ष्मणराव जाधव,गणेश जाधव, प्रसाद जाधव,अक्षय जाधव,मोहन जाधव,सिद्धेश्वर जाधव, गणेश जाधव, गणेश बेद्रे, दादा तौर, कृष्णा जाधव,प्रकाश बेद्रे, अशोक घुंगासे,गोरख जाधव तसेच कोथरूळ येथील ग्रामपंचायत सदस्य शत्रुघ्न कदम,गोविंदराव कदम,मुंजाभाऊ वाघे,वसंतराव कदम यांच्यासह अनेकांनी आज मोहनराव जगताप यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादचे पदाधिकारी विश्वंभर थावरे, श्रीहरी काळे, संतोष आबा यादव,श्रीकृष्ण सोळंके,कचरू तात्या खळगे, कमलाकर कदम, कल्याण जाधव, अब्बासभाई, प्रकाश चव्हाण, सरपंच भालचंद्र सोळंके, अंगद कटके, फिरोज इनामदार, ईश्वर होके,शरद यादव यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

**जालना शहर महानगरपालिका,जालना.**
प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड,जुना जालना -४३१ २०३
कार्यालय संपर्क ☎: (०२४८२)२३०३५०
E-mail : corncjalna@gmail.com Webside : jalnamahaulb.maharashtra.gov.in

**✻ स्वच्छतेबाबत जनतेस आवाहन ✻**

✻ आपल्या घरातील निघणारा कचरा हा ओला कचरा व सुका कचरा असा वर्गीकृत करून घंटा गाडीमध्येच टाकावा कचरा रस्त्यावर किंवा नालीमध्ये टाकु नये. कचरा इतरत्र टाकल्यामुळे परिसर अस्वच्छ होतो व नालीमध्ये पाणी तुंबते व डांस, जिवजतुंची उत्पत्ती होवुन रोगराई पसरते.
✻ कचरा रस्त्यावर नालीमध्ये टाकल्यास महानगरपालिकेतर्फे दंडात्मक कार्यवाही केली जाईल.
✻ शहरात सिंगल युज प्लास्टीक म्हणजे प्लास्टीकच्या वस्तु ज्या एकल वापर करण्यात येते अशा प्लास्टीक वापरावर बंदी असल्यामुळे कापडी किंवा कागदी पिशव्यांचा वापर करावा. बंदी असलेल्या प्लॉस्टीकचा वापर करण्यात आल्यास दंडात्मक कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.
✻ आपल्या घरातील कचरा हा घंटागाडीमध्येच वर्गीकृत करून टाकावा. मिश्र कचरा टाकु नये. तसेच घंटागाडी नाही आल्यास कचरा इतरत्र टाकु नये.
✻ घराभोवती दुषित पाणी साधु देवु नये. पाणी साठ्यांचे साधने नियमितपणे पुर्ण झाकुन ठेवावेत. आठवड्यातून एक दिवस ''कोरडा दिवस पाळावा या दिवशी घरातील सर्व पाणी साठे रिकामे करुन त्यांच्या आतील बाजु व तळ घासून पुसून स्वच्छ करून कोरडे करावेत.
✻ साचलेल्या नाल्या, डबके वाहते करावे व वाहत्या करता न येणाऱ्या पाण्यात आईल, रॉकेल टाकावे.
✻ आवश्यक ठिकाणी साठलेल्या पाण्यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत गप्पीमासे सोडावेत.
✻ खिडक्यांना जाळीदार पडदे बसवावेत, डास प्रतिबंधात्मक साधनांचा व मच्छरदानीचा वापर करावा.
✻ पाण्याचा अपव्यय टाळावा व नळाना तोटया लावाव्यात तसेच पाण्याची गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**✻ टॅक्स भरणेबाबत जनतेस आवाहन ✻**

✻ जालना शहर हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांनी आपल्याकडील नळपट्टी व मालमत्तेचा कराचा भरणा करावा.
✻ जालना शहर हदीतील सर्व मालमत्ता धारकांनी अवैध रित्या नळ कनेक्शन घेऊ नये.
✻ जालना शहर हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांनी अवैध रित्या घेतलेला नळकनेक्शन जालना शहर महागरपालिका.
✻ पाणीपुरवठा विभागात नळ कनेक्शन फीस भरुन वैध करून घ्यावे.
✻ मार्च २००५ पूर्वी मालमत्ता कराचा भरणा करावा नसता दंड व व्याजाची आकारणी केली जाईल.

**आयुक्त तथा प्रशासक**
**जालना शहर महानगरपालिका,जालना.**

**जाहिर सुचना / नोटिस**
**दिपावली २०२२ व दिपावली २०२३ मध्ये विनंती केली। आता विनंती नाही !!**
**अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांवर गुन्हे दाखल होणार !!!**

कार्यपध्दती:-
१. प्रत्यक्ष पाहणीमध्ये शहरातील सर्वच / बहुतांशी मालमत्ता धारकाकडे नळ कनेक्शन असल्याचे सिध्द.
२. मागील दोन वर्षाचा वेळ देवूनही मालमत्ता धारक नळ कनेक्शन नियमीत करत नाहीत आता कार्यवाही होणे अटळ.
३. सर्व अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित होईपर्यंत जुन्या मालमत्तांना नविन नळ कनेक्शन देणे बंद राहील कार्यवाही:-
अ) माहे नोव्हेंबर अखेर स्वत: हुन मागील दोन वर्षाच्या नळ पट्टीसह सर्व आकारणी भरुन नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी तयार असल्याचे या कामाकरीता नियुक्त केलेल्या अभिकर्तामार्फत कळवा
ब) माहे डिसेंबर पासून सर्वांवर नळ कनेक्शन बंद करुन पाणी चोरीचे व शासकीय मालमत्ता नुकसानीचे गुन्हे दाखल होतील.
क) या करीता महानगरपालिकेने अनाधिकृत नळ कनेक्शनचा शोध घेवून त्यांना नियमीत करणे किंवा गुन्हा दाखल करीता साई एजन्सीज, जालना यांची अभिकर्ता म्हणुन नेमणूक केली आहे.

**नियमित करण्याचा तपशील-**

| | |
|---|---|
| १. साल व सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाची- | रक्कम रु. ५.४००/- एवढी दंड म्हणुन |
| २. साल व सन २०२४-२५ ची नियमीत पाणी पट्टी- | रक्कम रु. २,७००/- एवढी दंड म्हणुन |
| ३. रोड दुरुस्ती चार्जेस व इतर- | रक्कम रु. १,०००/- एवढी दंड म्हणुन |
| ४. प्रशासकीय खर्च- | रक्कम रु. ९००/- एवढी रक्कम असे |
| | **एकुण १०,०००/- (रु. दहा हजार)** |

**वरीलप्रमाणे पध्दतीचा अवलंब करून सर्वानी मुदतीत आपले नळ कनेक्शन नियमित करावे.**

# रब्बीत गहू लागवड करण्या अगोदर 'ही' माहिती वाचा!

**रब्बी हंगाम पिकांची लागवड सुरु झालेली आहे. यावर्षी गहू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी या पिकाची पूर्वमशागत, सुधारित जाती, बीजप्रक्रिया आणि पेरणी पद्धती याविषयी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्वपूर्ण सल्ला दिलेला आहे. जाणून घेऊ याविषयी.**



**गहू पिकाचे लागवड पूर्व नियोजन :**

बागायती गहू पिकाचे नियोजन करणाऱ्या शेतकऱ्यांनी भारी व खोल जमीन निवडून पूर्व मशागत करावी. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद व ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सरे पाडावेत. जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर कोरडवाहू क्षेत्रातील गव्हाची पेरणी ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करावी. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी. संरक्षित पाण्याखालील गव्हासाठी हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.

**कोरडवाहू आणि मर्यादित सिंचनासाठी सुधारित जाती :**

सरबती जाती (जिरायती/कोरडवाहू) एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती) सरबती जाती (मर्यादित सिंचन) एन.आय.ए.डब्लू. १९९४ (फुले समाधान), एन.आय.ए.डब्लू. ३६२४ (फुले अनुपम), एन.आय.ए.डब्लू. ३१७० (फुले सात्विक), एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती). बन्सी जात (कोरडवाहू) - एम.ए.सी.एस.४०२८, एन.आय.डी.डब्लू.१९४९, एम.ए.सी.एस.४०५८. तांबेरा प्रतिकारक वाण- ए.के .डी. डब्लू २९९७- १६ (शरद).

**बीज प्रक्रिया आणि पेरणी :**

पेरणीपूवी बियाण्यास थायरम (७५% डब्लू. एस.) ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बीज प्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील गव्हाची पेरणी दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दाबून झाकले जाते.

# रब्बीतील मसूर लागवड तंत्रज्ञान





**भारतीय कडधान्य मसूर डाळ मोठ्या प्रमाणात दररोजच्या आहारात वापरात येत असल्यामुळे मसूर डाळीला अती महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. स्वयंपाक घरात महिलांच्या सर्वात जास्त आवडीची डाळ म्हणजे मसूर डाळ म्हंटले तरी वावगे ठरणार नाही.कारण मराठवाड्यात याच डाळी पासून प्रत्येक घरोघरी (वरन) ही भाजी बनवल्याशिवाय राहत नाही.**

राज्यात कडधान्य पिकामध्ये रब्बी हंगामातील मसूर पिकाला दिवसेंदिवस मागणीत वाढ होत असल्याने येणाऱ्या भविष्यात पिकाचे उत्पादनात कश्या प्रकारे वाढवता येईल हे आज आपण पाहणार आहोत .

**मसूर लागवड :** रब्बी हंगामातील डाळीच्या पिका मधील मसूर या पीकास अती महत्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रात या पिकाच्या लागवडी खालील क्षेत्र हे १०,५०० हेक्टर पर्यंत पेरणी करन्यात येईल असे शासकीय आकडेवारीत सांगण्यात आले आहे.

**जमीन :** हे पीक रब्बी हंगामात घेतले जाते. या पिकास काळी व मध्यम आकाराची व योग्य पाण्याचा निचरा जसे चिकणी जमीन असायला पाहिजे.

**हवामान :** पिकाची पेरणी रब्बी हंगामात प्रामुख्याने केली जाते. या पिकास तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान लाभदायक मानले जाते.

**पेरणी :** या वाणाची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात व व नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात हेक्टरी २० ते २५ किलो बियाणाची पेरणी करावी.

**खत व्यवसथापन :** खत व्यवस्थापण करते वेळी नैसर्गिक अवस्थेत कुजलेला खतांची पोषक मात्रा द्यावी जसे की शेणखत प्रति हेक्टरी १० टन द्यावे. ज्यामुळे जमीनीचा पोत सुधारते व कंपोष्ट खत झाडाच्या बुंध्याला देण्यात यावे.

**मसूर सुधारित जाती :** पुसा १ व पुसा ५ -( कालावधी १२२ ते १३० दिवस). डब्ल्यू बी ९४ -(कालावधी १२२ ते १३० दिवस). पंत एल २३४ -(कालावधी १२६ ते १३० दिवस). शेरी (डी.पी.एल ६२)कालावधी १२७ ते १३० दिवस). अरुण (पी एल ७७७-१२). पंत मसूर (कालावधी १३८ ते १४२ दिवस). वी एल मसूर. बी आर २५ (कालावधी १२६ ते १३० दिवस). नुरी (आई. पी. एल .८१). नरेंद्र मसूर परिपक्व कालावधी १३५ ते १४० दिवस.

**हेक्टरी उत्पादन :** वरील वाणाची निवड करून पेरणी केली असता सरासरी प्रति हेक्टरी उत्पादन १० ते १२ क्विंटल पर्यंत मिळते.

**तन नियंत्रण :** नोव्हेंबर महिन्यात पेरणी झाल्याने दव मोठ्या प्रमाणात पडते त्यामुळे गवताची वाढ होऊ नये म्हणून पेरणी नंतर २० ते २५ दिवसांनी पहिली तर ४९ ते ४२ दिवसांनी दुसरी खुरपणी करून घ्यावी.

**कीड नियंत्रण :** तन संपूर्ण नायनाट करण्यासाठी रासायनिक औषधे वापरली जात आहेत. त्यात फ्लुक्लोरीन किंवा पेंडीमेथीलिन ७५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# थंडीच्या मोसमात गाजर लागवड फायद्याची

भारत हा कृषिप्रधान देश आहे. अशा परिस्थितीत येथे सतत कोणत्या ना कोणत्या पिकाची लागवड केली जाते. त्याचबरोबर शेतीसाठी उपयुक्त अशा डझनभर प्रकारच्या माती येथे उपलब्ध असून पुरेसा पाऊसही आहे. अशा परिस्थितीत गाजराची शेती हा एक चांगला निर्णय ठरू शकतो. रूट भाज्यांमध्ये गाजरांना प्रमुख स्थान आहे. यामध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळते, जे डोळे आणि केसांसाठी चांगले आहे.

**बाजारात वर्षभर मागणी :**

गाजराचा वापर कच्च्या अन्नामध्ये, लोणचे, सॅलड्स, पुडिंग्स, फास्ट फूड आणि भाज्या बनवण्यासाठी केला जातो. त्यामुळेच त्याची मागणी बाजारात कायम असते. थंडीच्या काळात याला खूप मागणी असते. अशा परिस्थितीत गाजराच्या शेतीतून कमी वेळेत बंपर उत्पन्न मिळवता येते. तथापि, गाजराच्या योग्य जातीची निवड येथे खूप महत्त्वाची आहे.

**लागवड कालावधी :**

ऑगस्ट ते नोव्हेंबर हा काळ गाजर लागवडीसाठी योग्य आहे. गाजराची लागवड सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते, परंतु जर तुम्हाला खूप चांगले उत्पादन हवे असेल तर सैल चिकणमाती माती उत्तम आहे. गाजर लागवडीसाठी मातीचे मूल्य ६.५ किंवा त्याच्या आसपास सर्वोत्तम मानले जाते.

**अशी जमीन तयार करा :**

गाजर लागवडीसाठी पहिली नांगरणी माती फिरवणाऱ्या नांगराने करावी. यानंतर २ ते ३ वेळा मशागत चालवून जमीन सपाट करावी.

**खताची गरज :**

गाजर लागवडीसाठी १५० क्विंटल शेणखत किंवा कंपोस्ट खत आणि ७५ किलो प्रति हेक्टर नत्र आवश्यक आहे. यामध्ये शेणखत, स्फुरद व पालाश जमीन तयार करताना व नत्र पेरणीनंतर १५ व ३० दिवसांनी द्यावे. ही तीन सेंद्रिय खते फार कमी वेळात तयार करता येतात, ती पिकांसाठी खूप फायदेशीर असतात.

**बियाण्याचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया :**

गाजर लागवडीसाठी हेक्टरी ५ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी त्यांच्यावर उपचार करणे महत्वाचे आहे, जेणेकरून ओलसरपणासारखे रोग उद्भवणार नाहीत. यासाठी कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति किलो बियाण्यावर प्रक्रिया करावी.

**गाजर उत्पादन :**

गाजराचे सरासरी उत्पादन हेक्टरी किमान १२० क्विंटल आणि कमाल २०० ते २२५ क्विंटल प्रति हेक्टर आहे. काही जातींमध्ये कमाल उत्पादनही जास्त असू शकते.

**गाजर वाण :**

नॅन्टिस, पुसा मेघाली, पुसा रुधीर, पुसा अन्सीता, पुसा केसर, पुसा यमदग्नी, चाटेनी, इम्परेटर इत्यादी गाजराच्या जाती आहेत.



# करवंदाच्या लागवडीतून मिळतो भरपूर नफा

करवंद हे एक काळ्या रंगाचे छोटे फळ आहे. करवंदे महाराष्ट्रातील पश्चिम घाटात व कोकणात खूप प्रमाणात मिळतात. डोंगरकपारीत आपोआप उगवणारी करवंदाची काटेरी झुडपे अनेकदा पाहण्यात येतात. एप्रिल आणि मे हा हे फळ लागण्याचा काळ आहे. कच्ची करवंदे तोडल्यानंतर पांढऱ्या रंगाचा चीक येतो आणि तो हाताला चिकटतो. ही फळे जूनच्या सुमारास पाऊस सुरू झाल्यावर गळून जातात. करवंदांची चटणी करतात आणि शिवाय त्यांच्यापासून सरबत, लोणचे, मोरंबा वगैरे करता येतो. हे मध्यम आकाराचे काटेरी झाड असते. पण चांगलाच फल्लर (झुडूपासारखे)वाढते. करवंदा झाड लवकर मोठे होत नाही. खूप हळूहळू वाढते. शेळ्या-बकऱ्या या झाडाचा पाला खात नाहीत. तसेच काटेरी झाड असल्याने कुप (कुंपण) करण्याच्या कामी येते.

**उपयोग :** करवंदाच्या फळांची भाजी, रायता (लोणचे) चटणी , मुरब्बा करतात. कच्चेपण खातात. काहीजण वरणात टाकतात. चटनीने तोंडात चव येते. करवंद हे उतार अन्न आहे. उतार म्हणजे हे खाल्ल्याने इतर ओषधांचा गुण जातो व इतर औषधी, गोळ्या, इंजेक्शन लागू पडत नाही. उतार अन्न म्हणून करवंद व जांभूळ



या जुळ्या बहिणी आहेत. उतार अन्न असल्यामुळे व्रण किंवा जखम झाल्यास करवंद मुळीच खात नाही.

**अश्या प्रकारे करा करवंद लागवड:**

करवंद हे एक अत्यंत काटक व दुर्लक्षित झुडूपवर्गीय पीक असून, मुख्यतः कुंपणासाठी मोठ्या प्रमाणावर त्याची लागवड केली जाते. झाडाच्या फांद्यांना काटे असल्यामुळे गुरे खात नाहीत. करवंदाचे झाड कोणत्याही निचऱ्याच्या जमिनीत चांगल्या प्रकारे वाढते. ते हलक्या, मुरमाड, तसेच कातळ असलेल्या जमिनीतही चांगले येते. बियांपासून रोपे तयार करून अभिवृद्धी करता येत असली तरी इच्छित प्रकारच्या जाती, प्रकाराची अभिवृद्धीसाठी गुटी किंवा जून फांद्यांच्या छाट कलमांद्वारा करणे चांगले असते.

**करवंदाच्या जाती :**

करवंदाच्या जाती फळाच्या आणि गराच्या रंगावरून ठरविल्या जातात. विद्यापीठाने ''कोकण बोल्ड' नावाची नवीन जात प्रसारित केली आहे. या जातीची फळे मोठी (१२-१६ ग्रॅम) व घोसाने लागतात, तसेच फळाची प्रत उत्कृष्ट आहे. फळे गोलाकार असून, गराचे प्रमाण ९२ टक्के आहे. फळांचा टिकाऊपणा (चार दिवस) चांगला आहे. फळे गडद काळ्या रंगाची असून, त्यात ३६१ मिली ग्रॅम ''क' जीवनसत्त्व प्रति १०० ग्रॅम गरात आहे. फळातील बिया मृदू असून, चावून खाता येतात. कच्च्या व पक्व फळांपासून विविध प्रक्रिया केलेले टिकाऊ पदार्थ तयार करता येतात.

**लागवड पद्धत :**

कुंपणासाठी लागवड करताना दोन रोपांतील अंतर ९० ते १५० सेंमी ठेवावे, सलग लागवड करताना तीन ते चार मीटर अंतरांवर कलमे लावून लागवड करावी, लागवड केल्यावर कलमांना आधार द्यावा. लागवडीसाठी एप्रिल-मे महिन्यात ४५ बाय ४५ बाय ४५ सेंमी आकाराचे खड्डे खणून माती, चांगले कुजलेले शेणखत (दोन किलो) आणि २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट मिसळून पाऊस सुरू होण्याच्या अगोदर भरून ठेवावे. कलम लावल्यानंतर हिवाळ्यात १५ दिवसांच्या अंतराने व उन्हाळ्यात आठवड्याच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या लागवडीच्या पहिल्या वर्षी द्याव्यात म्हणजे कलमांची वाढ जोमदारपणे होईल व कलमांचे जगण्याचे प्रमाण वाढेल. प्रति कलमास सुमारे २० लिटर पाणी प्रत्येक पाळीस द्यावे. दुसऱ्या वर्षापासून कलमास पाणी देण्याची आवश्यकता नाही.

**खताची मात्रा :**

कलमाच्या चांगल्या वाढीसाठी आणि अधिक उत्पादनासाठी चौथ्या वर्षापासून प्रत्येक कलमास ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात २५ किलो शेणखत, १०० ग्रॅम युरिया आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत घालावे. फुले व फळधारणा लवकर होण्यासाठी खताच्या रिंगामध्ये १० ते १५ लिटर गोमूत्र जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात दोन ते तीन वेळा ओतावे. कलमांच्या सभोवती तणांची वाढ होऊ नये म्हणून १५ सेंमी जाडीचे पालापाचोळ्याचे आच्छादन द्यावे. पाचव्या वर्षापासून दर वर्षी फळे काढणीनंतर मे-जून महिन्यात फांद्यांची छाटणी करावी.




### महत्वाच्या घटना

१६८३ : छत्रपती संभाजी राजे यांच्या फौजेने फोंडा येथे अद्वितीय पराक्रम करून पोर्तुगिजांचा पराभव केला.
१७५५ भुकंप आणि सुनामीमुळे पोर्तुगालमधील लिस्बन शहर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले तर सुमारे ६०,००० ते ९०,००० लोक ठार झाले.
१८७० : मेरिकेत हवामान विभागाने पहिला अधिकृत हवामान अंदाज सांगितला.
१८४५ : मुंबईत आधुनिक पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या आद्य ग्रँट मेडिकल कॉलेज या पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रारंभ झाला.
१८४८: महिलांसाठी पहिले वैद्यकीय महाविद्यालय बोस्ट, मॅसेच्युसेट्स, यूएसए येथे सुरू झाले. नंतर याचे बोस्टन विश्वविद्यालयात विलीनीकरण झाले.
१८९६ : नॅशनल जिओग्राफिक मॅगझिनमध्ये पहिल्यांदाच नग्न चित्र प्रकाशित झाले.
१९२५ : गोविंदराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत वऱ्हाडातील स्वराज्य पक्षाच्या तिन्ही प्रांतिक समित्यांची एक अनौपचारिक संयुक्त बैठक झाली.
१९२८ : हिंदुस्थान सरकारने आपल्याला हवे तसे बदल विधेयकात करून त्याचे कायद्यात रुपांतर केले आणि नवी महसूल संहिता वऱ्हाडात लागू करण्यात आली.
१९४५ : ऑस्ट्रेलियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९५६ : भारतामध्ये भाषावार प्रांतरचना अस्तित्त्वात आली.
१९५६ : आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी कुर्नुल ही त्याची राजधानी होती.
१९५६ : दक्षिण भारतातील कन्नड भाषिक प्रदेश एकत्र करुन कर्नाटक राज्याची स्थापना करण्यात आली.
१९५६ : केरळ राज्य स्थापना दिन.
१९५६ : कन्याकुमारी जिल्हा केरळ मधुन तामिळनाडूमध्ये हस्तांतरित करण्यात आला.
१९६६ : पंजाब राज्याची पंजाब व हरियाणा राज्यात विभागणी झाली.
१९६८ : मोशन पिक्चर असोसिएशन ऑफ अमेरिकाच्या फिल्म रेटिंग सिस्टीमची अधिकृतपणे सुरवात झाली.
१९७३ : मैसूर राज्याचे नाव बदलुन ते कर्नाटक असे करण्यात आले.
१९७३ : लखदीप, मिनिकॉय, अग्निदीव बेटांचे नांव लक्षद्वीप असे ठेवण्यात आले.
१९८२ : अमेरिकेत मोटारगाड्यांचे उत्पादन करणारी होंडा ही पहिली आशियाई कंपनी बनली.
१९९३ : औपचारिकपणे युरोपियन युनियन स्थापन झाले.
१९९४ : मराठी चित्रपटसृष्टीतील विशेष कामगिरीचा गौरव म्हणून चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व लेखक दिनकर द. पाटील यांची चित्रभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.
१९९९ : कवी नारायण सुर्वे यांना मध्यप्रदेश सरकारचा कबीर पुरस्कार हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.
२००० : सर्बियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
२००५ : योगेशकुमार सभरवाल यांनी भारताचे वे३६ सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९५६ : द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : चित्रकार, नेपथ्यकार, रंगभूमिविषयक ग्रंथांचे लेखक पुरुषोत्तम श्रीपत काळे यांचा जन्म.
१८९३ : शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार इंदुभूषण बॅनर्जी यांचा जन्म. (मृत्यू: १३ नोव्हेंबर १९५६ कोलकता, पश्चिम बंगाल)
१९१८ : विनोदी अभिनेते शरद गणेश तळवळकर यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००१)
१९२६ : संगीत दिग्दर्शक कवी रेडिओ वरील सुगम संगीत विभाग प्रमुख, शब्द प्रधान गायकी चे लेखक यशवंत देव यांचा पेण येथे जन्म.
१९३२ : कवी अरुण बाळकृष्ण कोलटकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.
१९४० : भारताचे वे३५ सरन्यायाधीश रमेश चंद्र लाहोटी यांचा जन्म.
१९४५ : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)
१९६० : अपल इन्कचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कूक यांचा जन्म.
१९६३ : भारतीय उद्योजीका नीता अंबानी यांचा जन्म.
१९७३ : अभिनेत्री ऐश्वर्या राय यांचा जन्म.
१९७४ : क्रिकेटपटू वी. वी. एस. लक्ष्मण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७३ : बंगाली नाटककार दीनबंधू मित्र यांचे निधन.
१९५० : जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक बितीभूषण बंदोपाध्याय यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८९४)
१९८८ : ज्येष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांचे पुणे येथे निधन.
१९९१ : संगीतकार व संगीत संयोजक अरुण पौडवाल यांचे निधन.
१९९३ : ठुमरी, दादरा व गझल गायिका नैनोदेवी यांचे निधन.
१९९४ : शेती आणि पाणी विषयाचे तज्ञ, कामगार नेते कॉम्रेड दत्ता देशमुख यांचे निधन.
१९९६ : श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष ज्युनिअस जयवर्धने यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १९०६)
२००५ : लेखिका योगिनी जोगळेकर यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९२५)
२००७ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथा लेखक एस. अली रझा यांचे निधन.

# पाच वर्षे कुणालाही न विचारणाऱ्या मुंदडा यांना निवडणुकीत जनता, मतदार विचारतील का ?

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या नमिता मुंदडा ह्या दुसर्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत परंतु गेल्या पाच वर्षांत दोन चार कार्यकर्ते सोडता कुणालाही न विचारणाऱ्या मुंदडा यांना जनता त्यांची जागा दाखवणार का ?

''गेल्या पाच वर्षांपासून केज मतदार संघात आमदार नमिता मुंदडा असताना आपले आमदार कोण आहेत हे सुद्धा मतदार संघातील साठ टक्के जनतेला माहित नाही तसेच आमदार म्हणून आज पर्यंत सर्व सामान्य नागरीकांना भेटल्या नाहीत किंवा संपर्क केला नाही, सासरे व पती हेच आमदार असल्या सारखे जनते मध्ये वागत होते, केज मध्ये दोन चार कार्यकर्ते सोडता कुणालाही जवळ थारा दिला नाही, किंवा कोणत्याही कार्यकर्त्याला विचारात घेतले नाही, मंग निवडणुक जशी जशी जवळ येईल तसे ज्या गावात आज पर्यंत गेले नाहीत त्या गावात जाऊन आम्ही हे करू ते करु म्हणून खोटी आश्वासने देताना पहावयास मिळत आहे, दोन चार कार्यकर्ते घेऊन निवडणूका होत नसतात त्यासाठी सर्व सामान्य जनतेला तेवढेच प्रेम करावे लागते परंतु मुंदडा परीवारा कडुन तसे पहायला मिळत नाही, फक्त निवडणुकीपुरते खोटे (पुतना मावशीचे) प्रेम दाखवायचे आणि हम करे सो कायदा दाखवायचा परंतू या निवडणुकीत जनतेला कळुन चुकले आहे कोण आपल्या साठी आहे अणि कोण नाही ते या निवडणुकीत मुंदडा यांच्या विषयी केज मतदार संघातून नकारात्मक वातावरण दिसून येत आहे मुंदडा हटाव अशी भुमिका सध्या केज मतदार संघातील जनतेने हाती घेतलेली दिसून येत आहे, दगडा पेक्षा ईटकर मऊ राहिल अशी चर्चा केज मतदार संघातील जनतेतून चर्चिली जात आहे.

'केज मतदार संघात भाजपा चा मार्ग खडतर असून जनतेचा विरोध भाजपाला नसून भाजपा उमेद्वाराला दिसून येत आहे.

केज मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने आपला उमेदवार जाहीर केला व पुन्हा सौ नमिता मुंदडा यांना उमेदवारी मिळाली त्यांच्या बाबतीत भाजप अंतर्गत व इतर सर्वांची नाराजी आहेच पण आता समोरून शरद पवार गट राष्ट्रवादिचे पृथ्वीराज साठे असून अपक्ष उमेद्वार संगीता ठोंबरे, मनसेकडून रमेश गालफाडे, असे तगडे उमेदवार आहेत त्यामुळे नागरिक काय निर्णय अशी चर्चा मतदार संघात चर्चा सुरु आहे यावेळेची निवडणूक ही मुंदडा यांच्या साठी कठीण असणार आहे.



मागील साडेचार वर्षात झालेल्या कामाच्या आडवा आडवी , जातीय समीकरनाचा तिडा सोडवण हे नक्कीच कठीण असणार आहे. लोकसभा निवडणूक मध्ये केज मतदार संघ हा भाजपला खूपच मागे राहिला कारण लोकसभेला विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांचे अनेक संहकारी त्यांच्या सोबत न्हवते त्यावेळी त्यांच्या कडून लोक ऐकत नाहीत असे उत्तर दिले असल्याचे समजते तसेच अनेक गावात त्यांच्या सहकारी भाजप विरोधात होते अशी चर्चा आहे त्यामुळे बरेच पंकजाताई समर्थक हे विध्यमान आमदारावर नाराज आहेत. काही भाजपचे सोबत असतीलही परंतु मुंदडा गटा शिवाय त्यांच्या सोबत कोणी राहील असे चित्र आता तरी दिसत नाही त्यामुळे केज मतदार संघात बाकीचे मतदार आमचे ऐकत नाही त असंच त्यांना ऐकावं लागणार असे सांगणार असल्याचे बोलले जात आहे.

भाजपचा उमेदवार ठरला असल्यामुळे आता समोरून राष्ट्रवादी शरद पवारपक्षाकडून पृथ्वीराज साठे अपक्ष संगीता ठोंबरे, मनसे चे रमेश गालफाडे या पैकी जनता कोणाला कौल देणार यावर सर्व चित्र अवलंबून असेल यात जातीय समीकरण बरोबरच सगळ्या शक्यता तपासल्या जातील पुढे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक आहे त्यात काय तडजोडी केल्या जातात हे पन पहिले जाईल.

''महायुतीत पण मतदार संघात आलबेल राहणार नाही.

महायुती मधील घटक पक्ष देखील विद्यमान आमदारावर नाराज आहेत राष्ट्रवादी काँग्रेस धनंजय मुंडे साहेबांचे कार्यकर्ते व मुंदडा यांचे जमत नाही , री पा ई चे जमत नाही, शिवसेनेला कधीही विचारले नाही तर भाजप चे नांदूर घाट सर्कल बनसारोळा सर्कल , आडस सर्कल , विडा सर्कल व केज मध्ये प्रचंड नाराजी आहे. मागे आडस्कर साहेब सोबत होते , थोरात सोबत होते इतर पक्ष देखील शांत होते आता सगळेच नाराज आहेत त्यामुळे एखादा उमेदवार पैसे देऊन उभा जरी केला मतदान खाण्यासाठी तरी त्यात यश येईलच याची खात्री देऊ शकणार नाही कारण त्यांनी ही खेळी ज्यांच्यावर खेळणार आहेत त्यांच्यावर कितपत लोक विश्वास ठेवतील हाच मोठा प्रश्न असणार आहे. तसेच मैदानात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपचे उमेदवार तर आहेतच परंतु जर संगीता ठोंबरे व रमेश गालफाडे हे दोन उमेदवार अपक्ष आहेत त्यामुळे कदाचित ही निवडणूक रंगतदार होईल हे निश्चित दिसतेय.

# फारुक पटेल यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला मतदान करून मुस्लिम समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला -कुंदन काळे

## जिकडे स्वार्थ तिकडे फारूक पटेल विचारधारेच आणि मुस्लिम समाजाच यांना काहीही घेणं देणं नाही

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक २०२४ महाराष्ट्रा सह बीड जिल्ह्यामध्ये प्रचार यंत्रणा जोर घेत आहेत आजपर्यंत ज्या फारूक पटेल यांना क्षिरसागर कुटुंबाने सर्वस्व दिलं कोणतीही पात्रता नसताना नगरसेवक पदापासून उपनगराध्यक्ष पदापर्यंत सर्व वैभव मिळवून दिल पक्षाचा पार्टीचा आणि स्वतःच्या विचारधारेचा समाजाचा कोणताही विचार न करता जाती आणि धर्माच्या पार्टीसोबत आरोप पटेल साहेब स्वतःच्या स्वार्थासाठी निघून गेले आणि आज वर्तमानपत्र सोशल मीडियाच्या माध्यमातून मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीत भाजपला मतदान केलं आहे भाजपच्या कमळ चिन्हाला मी मतदान केलं आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाला बीडची जागा मिळावी म्हणून आवाहन करत आहेत मागणी करत आहेत मात्र भारतीय जनता पार्टीने सातत्याने मुस्लिम समाजाविषयी माझ्या मुस्लिम बांधवांविषयी सातत्याने अतिशय खालच्या दर्जाची भूमिका घेतली आहे नको ते वक्तव्य भाजपचे आमदार आशिष शेलार आमदार नितेश राणे नारायण राणे यासह भाजपचे वरिष्ठ नेते सातत्याने मुस्लिम समाजाला या देशात राहण्याचा अधिकार नाही मुस्लिम समाजाला या देशातून हद्दपार केला पाहिजे मुस्लिम समाजा दहशतवादी आणि अतिरेकी



असल्याची वागणूक या भाजप आमदार मंत्र्यांकडून दिले जाते यावर फारूक पटेल साहेब एक शब्द बोलायला तयार नाहीत स्वतःच्या स्वार्थासाठी मात्र आम्ही भाजपला मतदान केले आहे विधानसभेला आम्हाला मतदान करा आम्हाला उमेदवारी द्या आम्हाला निवडून द्या असा आवाहन करत आहेत त्यामुळे माझी मुस्लिम बांधवांना भगिनींना विनंती आहे जाती आणि धर्मात मतभेद लावून दंगली घडवणाऱ्या भाजप सारख्या जातीवादी पार्टी सोबत असलेल्या फारूक पटेल यांना आपण जाब विचारला पाहिजे गेले अनेक निवडणुकीमध्ये नगरसेवक म्हणून आपण त्यांना निवडून दिलं उपनगराध्यक्ष पदापर्यंत मानसन्मान दिला सत्तेतील सर्व मलिदा स्वतः घेतला समाजाशी इमानदारी करण्याची वेळ आली तेव्हा भाजप सारख्या जातीवादी पार्टीला त्यांनी मतदान करून स्वतःचा स्वार्थ साधला आणि आता परत विधानसभेमध्ये संधी मागत आहेत त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत २० तारखेला मतदान करत असताना मुस्लिम समाजाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या फारूक पटेल सारख्या स्वार्थी लोकांपासून मुस्लिम समाजाने दूरच राहिले पाहिजे कोणत्या पक्षाला मतदान केलं आणि कोणत्या पक्षाचा प्रचार केला हेही मुस्लिम समाजाने त्यांना मत मागायला आल्यानंतर विचारावे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षिरसागर यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेत्यांवर टीकाटिपणी करणाऱ्यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस जशास तसे उत्तर देईल चा इशारा राष्ट्रवादी विद्यार्थी मराठवाडा अध्यक्ष कुंदन काळे यांनी दिला आहे.

# तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च -निवृत्ती महाराज इंदुरीकर

आष्टी । प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले असून २८८ जागांसाठी २८ हजाराहून अधिक उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. या निवडणुकीचा खर्च हा वारेमाप होत असून त्याचा समाज सुधारण्यासाठी काही एक फायदा होत नाही. तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी करत असल्याची टीका ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केली. ते आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील श्री संत बाळूदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात कीर्तन प्रसंगी बोलत होते.



पुढे बोलताना इंदुरीकर म्हणाले की,गावचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सरपंचाला निवडून देतो मात्र अडीच-अडीच वर्षाच्या सरपंच पदाच्या निवडीमुळे गावचा विकास खुंटला आहे. सरपंच हा पूर्ण पाच वर्षे असावा. तरच गावचा विकास होऊ शकतो. वारकरी संप्रदाय हा मन शुद्ध असणारा वर्ग असून त्याला संसारात मोह,माया ही कधीच नसते. खरं बोलणारा व विद्वान माणसाचा आज समाजामध्ये कचरा झाला आहे. मी खरे बोलतो म्हणून मला गेल्या ३० वर्षापासून अनेक संकटाशी सामना करावा लागत आहे .मात्र मी कोणत्याही संकटाला घाबरलो नसून समाज सुधारण्याचे काम केले आहे. सध्या लोकांची एकमेकांची जिरवाजीरवी करण्यातच जिंदगी बरबाद होत असून या वायफाट गोष्टीकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्या गावातील शाळेकडे लक्ष द्या. शाळेतील मोबाईल बंद करा आणि सीसीटीव्ही बसवा. मुलींनो पळून जाऊन आईबाप व भावाची मान खाली घालण्यापेक्षा आई बापाचे उच्च शिक्षण घेऊन नाव कमविण्यातच तुमची जिंदगी उज्वल होईल. रागावर नियंत्रण ठेवून काम केल्यास निश्चितच यश मिळेल. काम ,क्रोध व मोहा पायी वाटोळे झाले असून ४० टक्के विद्यार्थी हे आज मोबाईल मधील रमी खेळून भिकारी झाले आहेत. गावातील मंदिरा सोबत शाळा कशी सुधारेल यासाठी गाव पुढाऱ्यांनी लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. आज महाविद्यालयीन मुले कर्जाच्या खायीत अडकले आहेत त्याचे कारण म्हणजे मोबाईल वरील रमी व शेअर मार्केट या व्यसनाने जिंदगी बरबाद झाली असून यापुढे कसायाला गाई देण्यात इतकेच दारुड्या मुलाला मुलगी देण्याचे पाप आहे. हे अनेक उदाहरणासह त्यांनी पटवून दिले. यावेळी परिसरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहन जगताप यांचा विजय निश्चित -सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

वीधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या प्रचारार्थ आज धारूर शहरातील हॉटेल श्रावणी पॅलेस येथे महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली.




याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते बोलताना असे म्हणाले की केंद्रामध्ये काँग्रेसचे सरकार असताना शेतकऱ्यांच्या कापसाचा भाव दहा ते बारा हजार रुपयापर्यंत गेला होता आणि या निर्दयी सरकारच्या काळामध्ये कापसाचा भाव सात ते साडेसात हजार रुपयांवरती येऊन ठप्प झाला आहे. या सरकारने दुसऱ्या देशातून पिकांची आयात केल्याने पिकाला भाव मिळत नाही. शेतकरी बांधवांना देशोधडीला लावण्याचे काम या सरकारने केले आहे.

आपल्या मूलभूत गरजांच्या मालावरती यामध्ये किराणा असेल वस्त्र असतील दैनंदिन आपल्या ज्या गरजा असतील त्याच्यावरती १८% जीएसटी लावण्याचे काम केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने या राज्यांमध्ये आणि देशांमध्ये केलेले आहे.लोकशाही सर्वसामान्य लोकांसाठी काम करते लोकांचे मूलभूत अधिकार त्यांच्या गरजा आणि त्यांना सुविधा पुरविण्याचे सरकार म्हणून त्यांचं काम असतं परंतु या सरकारने हे न करता १८% आणि २८% प्रमाणे जीएसटी वसूल करून तिजोरी भरण्याचं काम केलं.

सर्व जाती धर्मामध्ये भांडणे लावण्याचे काम फडणवीस शिंदे सरकारने केले.आरक्षणाच्या नावाखाली छोट्या-मोठ्या जातींमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून तेढ निर्माण करण्याचे काम या सरकारने केले आहे आणि आपल्या माजलगाव विधानसभेचे विद्यमान आमदार बघितले तर आमदारांना टक्केवारी सम्राट अशी पदवी दिली पाहिजे.

आणि म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार बंधू भगिनींना सोबत घेऊन चालणाऱ्या महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून सर्वांच्या सुखदुःखात मदतीला धावून येणारे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनदादा जगताप यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन केले.वा माजलगाव मतदारसंघातील शिवसैनिक मोहनदादा यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतील.. महाराष्ट्राच्या विधानभवनावरती महाविकास आघाडीचा झेंडा फडकाविण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे आसे आव्हान केले.यावेळी धारूर चे माजी नगराध्यक्ष अर्जुन दादा गायकवाड, मा[illegible]व चे माजी नगराध्यक्ष साहील भाई चाऊस, युवासेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, राष्ट्रवादीच्या जिल्हा संघटक नरीन बागवान ताई, शिवसेनेचे धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजी तालुका प्रमुख विनायकरावजी ढगे, युवा सेना तालुकाप्रमुख रोहित फावडे, युवा सेना शहर प्रमुख रोहित फावडे, सोशल मीडिया तालुका प्रमुख बलभीम मुंडे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, अमोल सिरसट, सुनील कोमटकर, अशोक आंधळे, शाम फावडे, दत्ता फावडे, वैभव कटाळे, शिवराज भोसले, बबलू जाधव, बाबा शेख, बळी वराडे, अंकुश कदम, शुभम शिंदे सह महाविकास आघाडी व सर्व मित्र पक्षाचे आजी माजी पदाधिकारी व मतदार बंधू उपस्थित होते..



# स्वत: चे दु:ख विसरून इतरांच्या सुखदु:खात सहभागी होणे हिच खरी मानवता - अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे

## रूग्णांना दीपावली फराळ वाटप करून प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने मागील ३५ वर्षापासूनची परंपरा जोपासली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वतः चे सुख किंवा दुःख विसरून इतरांच्या सुखदुःखात सामील होणे हीच खरी मानवता असल्याची भावना स्वा रा ती रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी व्यक्त केली. ते अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने दिपावली निमित्त स्वा रा ती येथील रुग्णांना फराळाचे वाटप करतांना बोलत होते. स्वा रा ती येथील रुग्ण व नातेवाईक यांची दिवाळी गोड होण्यासाठी त्याना फराळाचे वाटप प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. मागील ३५ वर्ष अविरतपणे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे रुग्णसेवेची सामाजिक परंपरा जोपासण्याचे कार्य करीत आहे. हीच परंपरा पुढे जोपासत आज गुरुवार दि.३१ ऑक्टोबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

गेल्या ३५ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील रूग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू केली आहे. दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३५ वर्ष सातत्य टिकवलेले आहे याबद्दल अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची स्थापना यांनी १९८९ साली केली गेली. तेंव्हाच्या सर्व तरूण सहकार्यांनी मंडळामार्फत विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस केला.त्याचाच एक भाग म्हणून स्वा रा ती येथील रुग्णांसाठी हा दिपावली फराळ वाटपाचा कार्यक्रम सुरू केला. ज्याचा सकारात्मक असा परिणाम रुग्ण व त्या रूग्णांचे नातेवाईक यांच्यावर दिसून आला .



राजकिशोर मोदी हे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ तथा इतर संस्थांच्या माध्यमातून गेली ४० ते ४५ वर्ष सातत्याने वेगवेगळ्या घटकावर काम करत आहेत. ज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड ,महारक्तदान शिबीर, कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य वाटप, कोरोना योद्धा सन्मान, निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी वॉकेथॉन ही व अशी अनेक सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवित असून याकामात त्यांना सर्व सहकार्यांचे पाठबळ मिळत आहे. म्हणूनच हे उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू आहेत. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम मोदी यांचे सहकारी करत आहेत .

दिपावली निमित्त स्व रा ती येथे फराळ वाटपाच्या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, डॉ.नागेश अब्दगिरे, ॲड विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, महादेव आदमाने,अमोल लोमटे , दिनेश भराडीया, धम्मा सरवदे , चंद्रकांत गायकवाड, सुनील वाघाळकर ,माणिक वडवणकर, गणेश मसने, कचरू सारडा,बबन पानकोळी, रुपेश चव्हाण, अकबर पठाण , अशोक देवकर, काझी खयामोद्दीन , अंकुश हेडे, विजय रापतवार , राजू मोरे, सुधाकर टेकाळे, मतीनं जरगर, गोविंद पोतंगले, सुभाष पाणकोळी , अकबर पठाण, मुक्तार शेख, खलील जाफरी, सय्यद ताहेर, सचिन जाधव, शाकेर काझी, जावेद गवळी,दत्ता सरवदे, विशाल पोटभरे, सय्यद रशीद , आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, नियामत पठाण, कैलास कांबळे, सुदाम देवकर, जमादार पठाण , शाहिद शेख, महेबूब गवळी, विशाल जगताप, विश्वजित शिंदे ,जावेद इस्माईल गवळी, अजीम जरगर ,वजीर भाई, दत्ता हिरवे, शुभम लखेरा,सुशील जोशी, रोहन कुरे, आशिष ढेले, जावेद भाई, रोहित हुलगुंडे, मुन्ना वेडे, सुशील जोशी, मारुफ शेख, कपिल संकाये, रोशन लाड यांच्यासह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी , राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
दिपावली विशेषांक
शुक्रवार दि.०१ नोव्हेंबर २०२४


## छाननीमध्ये उमेदवारांचे ९१ अर्ज अवैध

**जालना । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर (अ.जा.) आणि १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघातून निवडणुकीसाठी २५८ उमेदवारांनी ३८२ नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. यापैकी बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत उमेदवाराचे ९१ अर्ज अवैध ठरले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

छाननी प्रक्रियेत ९९-परतूर विधानसभा मतदार संघातील १८, १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघातील १२, १०१-जालना विधानसभा मतदार संघातील १३, १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील ३० आणि १०३- भोकरदन विधानसभा मतदार संघातील १८ नामनिर्देशन अर्ज अवैध ठरले आहेत. उमेदवारांना सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत आपले उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. विधानसभा मतदार संघ निवडणुकीचा निकाल शनिवार, दि. २३ नाव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर करण्यात येणार आहे.




## ऐन दिवाळीत सासरवाडीत राहणाऱ्या तरुणाचा खून

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील डोंगर पिपळा येथे ३५ वर्षीय तरुणाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये ही घटना घडल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

सचिन शिवाजी तिडके (वय ३५, रा. भोगलवाडी हल्ली मुक्काम डोंगरपिंपळा ता. अंबाजोगाई) येथील रहिवासी व डोंगर पिंपळा गावचा जावई आहे. मागील।एक वर्षापासून तो सासरवाडी डोंगर पिंपळा येथे पत्नी मुलांसोबत राहत होता. मंगळवारी रात्री पासून सचिन तिडके बेपत्ता होता. बुधवारी दुपारी एक वाजता त्याचा मृतदेह डोंगर पिंपळा शिवारात चेहऱ्यावर दगड मारुन चेंदामेंदा केलेल्या अवस्थेतआढळून आला. घटनास्थळी दारुच्या बाटल्या आढळून आल्या आहेत.

घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पीएसआय घुगे व पोलीस कॉन्स्टेबल भागवत यांनी घटनास्थळी धाव घेत सचिन याचा मृतदेह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. याबाबत गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया उद्या सकाळी होणार आहे. दरम्यान, सदरील खून हा सासरवाडीतील लोकांनीच घडवून आणला असल्याचे सचिनच्या नातेवाईकाचे म्हणणे आहे. कारण ते मृतदेहाजवळ गेले असता सासरवाडीकडील लोकांनी मयताच्या नातेवाईकांना शिवीगाळ व अंगावर दगड घेऊन धावले असल्याचे सांगत आहेत. सचिन याच्या पश्चात दोन मुले,पत्नी आईवडील भाऊ भावजय असा परिवार आहे.



































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# २३ किलो गांजा जप्त ; आळेफाटा पोलिसांची कारवाई

**आळेफाटा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे पुणे जिल्हाचे सरहद्दीवर उभारलेल्या तपासणी नाक्यावर आळेफाटा पोलीस व प्रशासनाचे कर्मचारी यांनी दुग्धजन्य व इतर पदार्थांची वाहतूक करणा-या शीतकरण वाहनातून आलेला २३ किलो गांजा पकडला. या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ६ लाख रुपये किमतींचा गांजा व ४५ लाख रुपये किमतीचा ट्रक असा ५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचे पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी सांगितले.

सुदर्शन गोविंद डोंगरे (वय २४, रा काळवाडी, ता जुन्नर) व देवसुंदर अमलेश मैथी (वय ४८, रा. पुर्व मेदनापूर पश्चिम बंगाल) अशी अटक केलेल्या चालकांची नावे आहेत.



पोलिस जबमवन दीपक नागरे यांनी याबाबत आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत आळेफाटा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ओडीसा येथून शीतकरण वाहनातून गांजा विक्रीस येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिस उपनिरीक्षक विनोद दुर्वे व पोलिस जवान शैलेश वाघमारे यांनी याचा वेळोवेळी मागोवा घेतला.

मंगळवारी (दि. २९) पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास आळेखिंडी तपासणी नाक्यावर दुग्धजन्य व इतर पदार्थांची वाहतूक करणारा टँकर (एमएच १४ जीयु ८०८८) आला असता पोलिसांनी टँकर थांबवून त्याची तपासणी केली असता त्यांना चालक केबिनमधून वास आला. अधिक तपासणी केली असता केबिनमध्ये २३ किलो ७०० ग्रॅम वजनाची गांजाचे पॅकेट्स आढळून आली. यानंतर हा ट्रक व मुद्देमाल घेऊन पोलिसांनी हा ट्रक आळेफाटा पोलीस ठाण्यात आणला. सुदर्शन डोंगरे व देवसुंदर मैथी या चालकांची चौकशी केली असता त्यांनी ओरीसा येथून जुन्नर, आंबेगाव व खेड तालुक्यात हा गांजा विक्रीस आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांना अटक करत ६ लाख रूपयांचा गांजा व ४५ लाख रूपये किंमतीचे शीतकरण वाहन जप्त केले. ही कामगिरी जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र चौधर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, पोलिस उपनिरीक्षक विनोद धुर्वे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंद्रशेखर डुंबरे, पोलिस हवालदार विनोद गायकवाड, भीमा लोंढे, पोपट कोकाटे, पोलीस जवान शैलेश वाघमारे, दीपक नागरे, भुजंग सुकाळे अमित माळुंजे, सचिन कोबल यांचे पथकाने केली.

# पुण्यात दोन गटांत हाणामारी, चाकूने सपासप वार

पुणे : पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, पुण्यातील वेगवेगळ्या भागातून दररोज गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत आहेत. यामुळे नागरिकांसोबतचं पोलिसही हैराण झाले आहेत. अशातच आता आळंदी रस्त्यावर असलेल्या कळस गावात पूर्ववैमनस्यातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. हाणामारीत चौघे जखमी झाले असून, याप्रकरणी परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राहुल भीष्मा चव्हाण (वय २४, रा. कळस ) याने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. चव्हाणच्या तक्रारीनुसार रोहित लोखंडे (रा. दिघी), गगन लाड (रा. टिंगरेनगर) आणि स्वप्नील महाजन (रा. कळस) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



चव्हाण सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास कळस गावातील स्मशानभूमीजवळून निघाला होता. त्यावेळी रोहित लोखंडे, गगन लाड यांनी त्याला बेदम मारहाण केली. त्याच्यावर चाकू आणि गजाने हल्ला करण्यात आला. मारहाणीत चव्हाण जखमी झाला, असे चव्हाणने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. रोहित उमेश लोखंडे (वय १९, रा. दिघी) याने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. रोहित हा त्याचा मित्र विशाल नरेंद्र गायकवाड (रा. कळस) याची वाट पाहत थांबला होता. त्यावेळी राहुल आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांनी त्याच्यावर हल्ला केला. याप्रकरणी तिघांविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# भरधाव ट्रकची क्रेनला धडक नवले ब्रिज जवळील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

नर्हे येथील नवले ब्रिजजवळ ब्रेक निकामी झाल्याने एका भरधाव वेगाने जाणार्या ट्रकने सर्व्हिस रस्त्यावर उभ्या असलेल्या क्रेनला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकचालक सलीम मकबूल शेख (५८ वर्षे, रा. डी. पी. रोड, मशीद जवळ, उमरगा) हा जागीच ठार झाला. तर ट्रकमधील समीर आयुब मोमीन (रा. उमरगा) हा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना बुधवारी (दि.३०) दुपारी अडीच वाजता नवले ब्रिजजवळ नर्हे येथे घडली. घटनेची माहिती



समजताच सहायक पोलिस आयुक्त अजय परमार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, पोलिस निरीक्षक डॉ. उत्तम भजनावळे, पोलिस उपनिरीक्षक निकेतन निंबाळकर हे तत्काळ घटनास्थळी पोहचले. जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु चालकाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

कात्रज बाजूकडून नवले ब्रिज बाजूकडे ट्रक येत असताना पेट्रोल पंपासमोरील उतारावर या वाहनाचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. हे वाहन भरधाव वेगाने जात असताना चालकाने प्रसंगावधान राखून शेजारील सर्व्हिस रस्त्यावर उभ्या असलेल्या क्रेनवर हे वाहन धडकवले. ही धडक एवढी जबरदस्त होती की, या धडकेत क्रेनच्या केबिनचा व ट्रकच्या केबिनचा चक्काचूर झाला. या वेळी गॅस कटरच्या साहाय्याने वाहनांच्या केबिनचा पत्रा कापून आतमध्ये अडकलेल्यांना बाहेर काढले. दोन भल्या मोठ्या क्रेनच्या साहाय्याने ही वाहने बाजूला घेण्यात आली.

# दिवाळीमुळे ‘या’ वेळेत राहणार मेट्रो सेवा बंद

पुणे । प्रतिनिधी

देशभरामध्ये दिवाळीचा मोठा उत्साह दिसून येत आहे. दिवाळीनिमित्त अनेक सोयी सुविधांमध्ये बदल करण्यात आला आहे. पुणे मेट्रो सेवेबाबत देखील बदल करण्यात आला आहे. त्यामुळे मेट्रोने प्रवास करणार असाल तर ही बातमी महत्त्वाची ठरणार आहे. दिवाळीच्या निमित्त पुण्यातील मेट्रो सेवेमध्ये बदल करण्यात आला आहे.

पुणे मेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून दिवाळीबाबत मेट्रो सेवा बंद असल्याची घोषणा करण्यात आली आहे. पुणे मेट्रोने



बुधवारी आपल्या प्रवाशांसाठी सोशल मीडियावर एक महत्त्वाचे अपडेट शेअर केले. शुक्रवारी (१ नोव्हेंबर) लक्ष्मीपूजनामुळे सायंकाळच्या वेळेमध्ये मेट्रो बंद राहणार आहे. पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गावरील (पीसीएमसी ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी) मेट्रो सेवा संध्याकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत बंद राहणार आहे. सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत ही सेवा सुरू राहणार आहे.

# कात्रजमध्ये टोळक्याकडून वाहनांची तोडफोड

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज येथील सुंदरनगर परिसरात मंगळवारी ( दि. २९) मध्यरात्री गुंडांच्या टोळक्याने दोघा तरुणांवर हल्ला करून तेथील वाहनांचीही तोडफोड केली. संशयित आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

यासंदर्भात सुमित मारुती पंडित (वय २७, रा. स्वामी समर्थ सदन, सुंदरनगर, कात्रज) याने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली आहे. त्यानुसार पोलिसांनी गणेश माळवे, यश घोडके व त्यांच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना सुंदरनगरमध्ये मंगळवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास घडली.

सुमित, त्याचा भाऊ किरण आणि मित्र स्वप्निल हे रिक्षात



गप्पा मारत बसले होते. त्यावेळी आरोपी मद्यधुंद अवस्थेत दुचाकीवरुन तेथे आले. त्यापैकी दोघांच्या हातात लोखंडी कोयते होते. त्यांनी सुमितवर हल्ला केला. त्यानंतर या तिघांनी तेथे उभ्या केलेल्या रिक्षा व चारचाकी वाहनांची तोडफोड केली. तेथून जवळच राहणार्या किशोर कुचेकर, मल्लिनाथ मळवडे यांनाही या टोळक्याने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी वृंदावन सोसायटीजवळ उभ्या करण्यात आलेल्या सहा वाहनांच्या काचा फोडल्या. या प्रकाराची माहिती मिळाल्यावर सहकारनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोचले. त्यांनी आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुचाकीवरून हे टोळके पसार झाले. त्यानंतर दोघांना संशयावरून ताब्यात घेण्यात आले आहे.

# ओतूर येथे उद्या ‘बळीराजा’ मिरवणूक

ओतूर, : ओतूर (ता. जुन्नर) येथे दिवाळी पाडवा म्हणजेच बलिप्रतिपदेला येत्या शनिवारी (ता. २) ओतूर शहरात बळीराजाच्या भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर डुंबरे यांनी दिली.

सत्यशोधक समाज व भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने यावेळी विविध पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ओतूर नवीन एसटी बस स्थानक ते पांढरी मारुती मंदिर व्यासपीठ अशी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.


मिरवणुकीत शिवकालीन साहसी कौशल्य दाखवणारे पथक, पारंपारिक वाद्य पथके, महिला लेझीम पथक, झांज पथक, वारकरी दिंडी पथक, भजनी व टाळ पथक, महाराष्ट्राची संस्कृती जपणारे बलुतेदार यांच्यासह अनेक आकर्षण असणार आहे. तसेच बळीराजाच्या प्रतिकृतीची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रमेश डुंबरे यांच्या हस्ते बळीराजा प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रम आणि शेतकऱ्यांचा राजा बळीराजाचे स्मरण व महत्त्व सांगणारे व्याख्यानाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे हे पहिलेच वर्ष असून, शेतकऱ्यांनी यात मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# सीए फाउंडेशन, इंटरमीडिएट परीक्षेचा निकाल जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे (आयसीएआय) सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए) फाउंडेशन आणि इंटरमीडिएट परीक्षेचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला.

सीए इंटरमिजिएट परीक्षेसाठी १ लाख ३९ हजार ६४६ उमेदवार प्रवेशित होते. ४५९ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली होती. यात ग्रुप १ च्या परीक्षेला ६९ हजार २२७ उमेदवार बसले होते. यातील १० हजार ५०५ म्हणजेच १५.१७ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले. ग्रुप २ च्या परीक्षेला ५० हजार ७६० उमेदवार बसले. त्यातील ८ हजार ११७ म्हणजेच १५.९९ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले. दोन्ही ग्रुपमध्ये २३ हजार ४८२ उमेदवार परीक्षेला बसले होते. त्यातील १ हजार ३३० म्हणजेच ५.६६ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत मुंबईतील पारमी उमेश पारेख हिने ४८४ (८०.६७ टक्के) गुणांसह देशात प्रथम क्रमांक मिळवला. त्यानंतर चेन्नईची तान्या गुप्ता ४५९ ( ७६.५० टक्के) गुणांसह दुसरा क्रमांक मिळवला. नवी दिल्लीतील विधी जैन हिने ४४१ (७३.५० टक्के) गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला आहे. चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए) फाउंडेशन परीक्षेसाठी ७८ हजार २०९ उमेदवार प्रवेशित होते. एकुण ४५३ केंद्रावर ही परीक्षा




घेण्यात आली होती. या परीक्षेला एकुण ७० हजार ४३७ उमेदवार बसले होते. त्यातील १३ हजार ८५८ म्हणजेच १९.६७ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. ३७ हजार ७७४ मुलांनी परीक्षा दिली होती. त्यातील ७ हजार ७३२ म्हणजेच २०.४७ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत. ३२ हजार ६६३ मुलींनी परीक्षा दिली होती. त्यातील ६ हजार १२६ म्हणजेच १८.७६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

# उमेदवारी अर्ज भरू नको म्हणत जीवे मारण्याची धमकी ; राहुल कलाटेंविरोधात गुन्हा दाखल

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्यत विधानसभा निवडणूकीसाठी र्स राजकीय पक्षातील नेते प्रचार करत आहेत. अनेक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अशातच आता पुण्यातून एक धक्कादायक प्रकार उकडकीस आला आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी चाललेल्या उमेदवाराला तु अर्ज भरला तर तुला पाहून घेईन, अशी दमदाटी करीत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, त्यांच्या हातातील निवडणूक संदर्भातील कागदपत्रे गॅलरीमधून खाली फेकून दिल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या



विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना थेरगाव येथील महापालिकेच्या ग प्रभाग कार्यालयाच्या तिसर्या मजल्यावर मंगळवारी (दि. २९) दुपारी पावणेतीनच्या सुमारास घडली.

जावेद रशीद शेख (वय ३५, रा. आदर्श कॉलनी, वाकड) यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल तानाजी कलाटे (वय ४८) यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. जावेद शेख हे वंचित बहूजन आघाडी पक्षातर्फे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी चालले होते. यावेळी कलाटे यांनी शेख यांना उद्देशून तु कशाला अर्ज भरतोय, तु अर्ज भरला तर तुला पाहून घेईन, असे म्हणत शेख यांना मारून टाकण्याची धमकी दिली. तसेच, त्यांच्या हातातील निवडणूक संदर्भातील कागदपत्रे गॅलरीमधून खाली फेकून दिली. फौजदार बालाजी मेटे अधिक तपास करीत आहेत.

## बंडखोर नेत्यांची समजूत

राज्यातील विधानसभा निवडणुकीत बंडखोरी रोखण्यासाठी महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांकडून जोरदार प्रयत्न सुरु आहेत. ४ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यापूर्वी आपल्या गटातील बंडखोरांची समजूत काढून अधिकृत उमेदवाराच्या विजयाचा मार्ग निर्धोक करण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते राबत आहेत. राज्यात मविआची सत्ता आली तर तुम्हाला विधानपरिषदेची आमदारकी देऊ किंवा महामंडळ देतो, अशी आश्वासने मविआच्या नेत्यांकडून बंडखोरांना दिली जात असल्याचे समजते.

# अजितदादांच्या मनधरणीनंतरही नाना काटे बंडखोरीवर ठाम



पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

चिंचवड विधानसभेतील नाना काटे यांची बंडखोरी रोखण्यासाठी स्वतः अजित पवार यांच्या घरी पोहचले. दोघांमध्ये जवळपास तासभर चर्चा देखील झाली, मात्र त्यानंतर ही नाना काटे बंडखोरीवर ठाम आहेत. भाजपचे उमेदवार शंकर जगताप आणि शरद पवार गटाचे राहुल कलाटे यांच्या विरोधात नाना काटे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. अजित पवारांनी भेट घेतल्यानंतर नाना काटे म्हणाले, आमची फार काही चर्चा झाली नाही. दिवाळीनिमित्त आम्ही भेटलो. दादांनी मला फोन केला आणि मी बारामतीला जाणार आहे, भेटून जातो म्हणाले त्यानुसार ते घरी भेटण्यासाठी आले होते.

ते आले तेव्हा राजकीय गोष्टीवर चर्चा झाली. निवडणुकीत काय परिस्थिती असेल याबाबत चर्चा झाली. अर्ज मागे घेण्याबाबत चर्चा झाली नाही. त्यामुळे आम्ही निवडणुकीवर ठाम आहोत. महायुतीचा उमेदवार चिंचवड मधला आहे. त्यामुळे ते कदाचित आले असतील. दादांच्या पक्षांचा मी आहे, त्यामुळे ते आले असतील, मात्र, उमेदवारी मागे घेण्याबाबत आमच्यात चर्चा झाली नाही. त्यांनी मतदारसंघातील सर्व माहिती जाणून घेतल्याची माहिती यावेळी नाना काटेंनी दिली आहे. महायुतीकडून चिंचवडची जागा भाजपला सुटली आहे, भाजपने शंकर जगतापांना उमेदवारी जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत असलेले नाना काटे यांना शेवटी शरद पवारांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळाली नव्हती. उमेदवारी न मिळाल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक नाना काटे यांनी अखेर अपक्ष लढण्याचं जाहीर केलं आहे. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज देखील भरला आहे. त्यामुळे महायुतीकडून लढत असलेले भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना काही प्रमाणात फटका बसण्याची शक्यता आहे.